# हिमालयाचीं शिखरें

साने गुरुजी

हिमालयाचीं शिखरें

रु. ३–५०

एकमेव वितरक

छवि प्रकाशन

५६५ शनिवार पेठ,
पुणे ३०

हिमालयाचीं शिखरें । साने गुरुजी । प्रथमावृत्ति । ११ जून, १९७१ । किंमत : साडेतीन रुपये । प्रकाशक : हरिभाऊ लिमये, ९६८, सदाशिव पेठ, पुणे ३०. । मुद्रक : गोपाळ मोकाशी, रचना मुद्रणालय, ५६५ शनिवार पेठ, पुणे ३०. ।

रुचि प्रकाशन

प्रमुख वितरक :
रुचि प्रकाशन, ५६५ शनिवार पेठ, पुणे ३०.
फोन नं. : ५८१३६



चरित्रक्रम : श्री शिवराय। स्वामी विवेकानंद। लो. टिळक। डॉ. आंबेडकर। म. फुले। नेताजी। दादाभाई नौरोजी। रविंद्रनाथ टागोर। अरविंद घोष। राजाजी। राजेंद्रबाबू। चित्तरंजनदास। लाला लजपतराय। जतीनदास। भगतसिंग। आगरकर। चिपळुणकर। भाऊराव पाटील। डॉ. केतकर। हुतात्मा कोतवाल। सेनापति बापट। कस्तुरबा।

## मनोगत

मागील वर्षी स्वर्गीय सानेगुरुजींच्या विचारांचे दर्शन घडविणारे "स्वप्न आणि सत्य" हे पुस्तक मी संपादित केलें. या पुस्तकांत समाविष्ट केलेले बहुतेक सर्व विषय तात्विक स्वरूपाचे आहेत. त्याचवेळी कुमार वाचकांचे-साठी हे पुस्तक मी तयार केले होते. परंतु काही अडचणीमुळे ते प्रकाशित होऊ शकलें नाही. आज हे पुस्तक वाचकांचे हाती देतांना समाधान वाटत आहे.

१५ ऑगस्ट १९४८ ते १० जून १९५० पर्यंत साने गुरुजी साधना साप्ताहिकाचे संपादकत्व करीत होते. या अल्प काळांत त्यांनी भारतांतील अनेक थोर व तेजस्वी व्यक्तींच्या कार्याबद्दल लिखाण केलेले आहे. त्यांत छत्रपति शिवाजीमहाराज आहेत, महान् समाज-सुधारक फुले, आगरकर आहेत. देशासाठी हसत बलिदान करणारे भगतसिंग, कोतवाल यासारखे हुतात्मे आहेत, सेनापती बापट व कस्तुरबा यांच्यासारख्या त्यागमूर्ति आहेत. हिमालयासारख्या उत्तुंग व्यक्ति-मत्त्वाच्या या व्यक्ति आणि गुरुजींची सिद्ध लेखणी असा हा संगम वाचकांना खचितच आवडेल अशी मला आशा आहे.

या पुस्तकास श्री. अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांची प्रस्ता-वना मिळाली ही मी भाग्याची गोष्ट समजतो. प्रकृति बरी नसतानाही त्यांनी प्रस्तावना दिली याबद्दल अत्यंत कृतज्ञतापूर्वक मी त्यांचे आभार मानतो.

गुरुजींच्या या पुस्तकासाठी महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री मधुकरराव चौधरी यांनी पुरस्कारार्थ चार शब्द लिहून दिले याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

गुरुजींचे विचारवाङ्मय प्रसिद्ध करण्यासाठी साधना साप्ताहिकांतील मजकूर वापरण्याची परवानगी दिल्याबद्दल मी साधनाकारांचे आभार मानतो.

पुस्तकाच्या अंतरंग-बहिरंग छपाईची जबाबदारी माझे मित्र गोपाळ मोकाशी, सर्जेराव घोरपडे व श्रीपाद केळकर यांनी घेतली. त्याचप्रमाणे लिखाणाचे कामी श्री. नीलकंठ काळे, बापू वैद्य व श्री. पूरकर या मित्रांनी सतत श्रम घेतले. त्यामुळे माझे कामाचा बराचसा भार कमी झाला. "समता मंडळा" च्या सभासदांनी या कार्यांत रस घेऊन सदैव सहकार्य दिले. १९४२ च्या चळवळीतील माझे मित्र श्री. बापू साळवी, बाबुराव चव्हाण, अनंतराव मेमाणे, विनायक राजगुरु, मुरलीधर गंधे यांचे तर मला सदैव सहकार्य आहे. या सर्व मित्रांचे त्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल व मदतीबद्दल मनःपूर्वक आभार मानून माझे मनोगत संपवतो.

ता. ११ जून १९७१

हरि लिमये

शिक्षण मंत्री
महाराष्ट्र
सचिवालय, मुंबई-३२.

सत्यमेव जयते

25 MAY 1971

मानवतेचा महान पुजारी, पावित्र्य व सौजन्य यांची मंगलमूर्ती, पददलित व उपेक्षितांकडे मातृहृदयानें पाहणाऱ्या समर्पित जीवनाचे प्रतिक, आधुनिक संत, सामाजिक समानता प्रस्थापित करण्याकरिता आपले प्राण पणाला लावणारा एक असामान्य नेता, समाजसेवक व साहित्यिक अशा विविध पैलूंचे दर्शन घडविणारे पूज्य साने गुरुजींचे समृध्द व्यक्तिमत्व होते. मराठी साहित्यात गुरुजींनी आपल्या लिखाणाने मोलाची भर घातली आहे. "श्यामची आई" "धडपडणारी मुले", इत्यादींचा उल्लेख ह्या संदर्भात करता येईल. ह्याच्या साहित्यानें महाराष्ट्रात अभूतपूर्व लोकप्रियता मिळविली आहे. आजही त्यांचे साहित्य घरोघरी आबाल वृध्दांपासून मोठ्या आवडीने वाचले जाते. त्यांच्या साहित्यात जिवंतपणा आहे. साहित्यातली संस्कार संपन्नता व ललित साहित्याच्या माध्यमातून राष्ट्रीय आंदोलनाचे त्यांनी केलेले प्रभावी विश्लेषण यामुळें महाराष्ट्र सारस्वतात त्यांना मानाचे स्थान आहे. पू. गुरुजींची ग्रंथ रचना अमाप होती. त्यापैकी बरेचसे लिखाण त्यांच्या ह्यातीत प्रकाशित झालेले असले तरी तितक्याच मोलाचे लिखाण आजही अप्रकाशित आहे. ही उणीव दूर करण्याच्या उद्देशानें त्यांचे अप्रकाशित साहित्य 'हिमालयाची शिखरे', 'मेगस्थिनीस—' ~~[illegible]~~', 'चंद्रभागेच्या वाळवंटी', ह्या पुस्तकांचे प्रकाशन करून ते जनतेप्रत पोहोचविण्याचे स्तुत्य कार्य आपण हाती घेतल्याबद्दल मी आपल्याला मनःपूर्वक धन्यवाद देतो व या पवित्र कार्यास सुयश चिंतितो.

(म. ध. चौधरी.)

# महान् पुरुष : महान् काळ

श्री. हरिभाऊ लिमये यांनी ‘ हिमालयाची शिखरे ’ या पुस्तकासाठी जे मनोगत लिहिलेले आहे, त्यात असे स्पष्ट म्हटले आहे की, १५ ऑगस्ट, १९४८ ते ११ जून १९५० पर्यंत स्वर्गस्थ साने गुरुजी ‘ साधना ’ साप्ताहिकाचे संपादकाचे काम करत होते. त्या कालात त्यांनी थोर व तेजस्वी व्यक्तींच्याबद्दल त्या व्यक्तींच्या जयंत्या किंवा पुण्यतिथी या निमित्ताने जे प्रासंगिक लिखाण केले ते या ‘ हिमालयाची शिखरे ’ या पुस्तकात संकलित केलेले आहे. श्री. हरिभाऊ लिमये यांनी जर ज्या तारखेस हे लिखाण प्रसिद्ध झाले त्या तारखा प्रत्येक लेखाच्या शेवटी उद्धृत केल्या असत्या तर ते जास्त उपयुक्त झाले असते.

प्रस्तावना लिहिण्याच्या दृष्टीने मी ‘ हिमालयाची शिखरे ’ पुस्तक काळजीपूर्वक वाचले. श्री. हरिभाऊ लिमये यांचे मला आभार मानले पाहिजेत कीं प्रस्तावना लिहिण्याच्या निमित्ताने का होईना या वीस-बावीस थोर महात्म्यांच्या स्फूर्ति देणाऱ्या आठवणी मला वाचण्याचा सुयोग प्राप्त झाला.

ज्यावेळी ह्यांचे मी वाचन केले, त्यावेळी प्रथमतःच सगळ्याच थोर महात्म्यांची जन्मतारीख व मृत्यूतारीख आपण हुडकून काढली पाहिजे असे माझ्या मनात आले. म्हणून मी ज्या क्रमाने ‘ हिमालयाची शिखरे ’ लिहिली गेली आहेत तोच क्रम कायम ठेवून प्रत्येक थोर पुरुषाची जन्म-तारीख व निर्वाणतारीख हुडकून काढली. ती वाचकांच्यासाठी प्रस्तावनेच्या स्वरुपात जर नमूद केली गेली तर वाचकांना त्याचा उपयोग होईल असे वाटल्यावरून ती खाली देत आहे.

| सनावली | जन्मदिन | | मृत्युदिन | |
|---|---|---|---|---|
| १. शिवराय | १९ फेब्रुवारी | १६३० | ४ एप्रिल | १६८० |
| | ( फाल्गुन वद्य तृतीया १५५१ ) | | ( चैत्र शुद्ध पौ. १६०२ ) | |
| २. विवेकानंद | ९ जानेवारी | १८६२ | ४ जुलै | १९०२ |
| ३. लो. टिळक | २३ जुलै | १८५६ | १ ऑगस्ट | १९२० |
| ४. डॉ. आंबेडकर | १४ एप्रिल | १८९३ | ६ डिसेंबर | १९५६ |
| ५. ज्योतिबा फुले | | १८२७ | २७ नोव्हें. | १८९० |
| ६. सुभाषचंद्र बोस | २७ जानेवारी | १८९७ | १८ ऑगस्ट | १९४५ |
| ७. दादाभाई नौरोजी | ४ सप्टें. | १८२५ | ३० जून | १९१७ |
| ८. रवींद्रनाथ टागोर | ६ मे | १८६१ | ७ ऑगस्ट | १९४१ |
| ९. अरविंद घोष | १५ ऑगस्ट | १८७२ | ५ डिसेंबर | १९५० |
| १०. राजगोपालाचारी | ८ डिसेंबर | १८७९ | | |
| ११. राजेंद्रबाबू | ३ डिसेंबर | १८८४ | २८ फेब्रु. | १९६३ |
| १२. चित्तरंजनदास | ५ नोव्हेंबर | १८७० | ६ जून | १९२५ |
| १३. लाला लजपतराय | | १८६५ | १७ नोव्हें. | १९२८ |
| १४. हुतात्मा जतीनदास | | | १३ सप्टें. | १९२९ |
| १५. सरदार भगतसिंग | ऑक्टोबर | १९०७ | २३ मार्च | १९३१ |
| १६. आगरकर | १८ जुलै | १८५६ | १७ जून | १८९५ |
| १७. चिपळुणकर | २० मे | १८५० | १७ मार्च | १८८२ |
| १८. भाऊराव पाटील | १ सप्टेंबर | १८८६ | ९ मे | १९५९ |
| १९. डॉ. केतकर | २ फेब्रुवारी | १८८४ | १० एप्रिल | १९३७ |
| २०. हुतात्मा कोतवाल | १ डिसेंबर | १९१२ | २ जाने. | १९४३ |
| २१. सेनापती बापट | १२ नोव्हेंबर | १८८० | २७ नोव्हें. | १९६७ |
| २२. कस्तुरबा गांधी | एप्रिल | १८६९ | २२ फेब्रुवारी | १९४४ |

या थोर महात्म्यांचा कर्तृत्वकाल जर लक्षात घेतला तर सुमारे गेल्या शेसवाशे वर्षांचा इतिहास डोळ्यापुढे उभा रहातो. ज्योतिबा फुले १८२७ साली जन्मले व १८९० साली त्यांचा मृत्यु झाला. श्री. दादाभाई नौरोजी यांचाही जन्म १८२५ चा आहे व मृत्यू १९१७ चा. दोघां-नीही आपापल्या परीने त्या युगात क्रांतिकारक चळवळी केलेल्या आहेत. म. ज्योतिबा फुले यांनी त्या काळात मुलींच्या शाळा काढल्या, हरि-जनांसाठी हौद खुला केला, सत्यशोधक चळवळ सुरू केली. रूढीवर कोरडे ओढले, स्वतःला श्रेष्ठ मानणाऱ्या जातींवर प्रहार केले व समताधर्म किंवा मानवताधर्म स्थापन करण्यासाठी अहोरात्र आपला देह झिजवला. महर्षि दादाभाई नौरोजी यांनीहि त्या कालात मुलींच्या शिक्षणाचा पाया घातला. ४४ पारशी मुली व २४ हिंदु मुली यांना एकत्र जमवून त्यांची शाळा सुरू केली. ज्यावेळी परदेशगमन हे निषिद्ध समजले जात असे त्यावेळी इंग्लंडमध्ये जाऊन हिंदुस्थानची बाजू त्यांनी तिथल्या लोकांपुढे मांडली. हिंदुस्थानचे दर माणशी वार्षिक उत्पन्न फक्त २० रु. आहे, भारताची पिळवणूक ब्रिटीशांकडून आज होत आहे ही गोष्ट जर कुणी प्रथमतः मांडली असेल तर दादाभाईंनी. १९०७ च्या कलकत्ता काँग्रेसमध्ये स्वराज्य, स्वदेशी व बहिष्कार या ध्येयवादाचा उच्चार प्रथमतः दादाभाईंनीच केला. तेथे पार्लमेंटमध्ये निवडून येवून त्यांनी हिंदुस्थानची बाजू इंग्ली-शांच्यापुढे मांडली. ' जे हाती घ्याल.ते तडीस न्या ' असा संदेश त्यांनी आपल्या राष्ट्राला दिला व निर्भयपणे हिंदुस्थानची वकिली त्यांनी केली. हे दोघेही महापुरुष १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाच्या पूर्वीच्या कालात जन्मले व त्याच कालात त्यांच्या क्रांतिकारक कार्यालाही आरंभ झाला.

शिवरायांचे चरित्र हे ३०० वर्षांपूर्वीचे चरित्र आहे. त्यासंबंधी आज इतके बोलले व लिहिले जात आहे की त्यांच्याबद्दल मी येथे जास्त लिहित नाही. पण आज पूर्व बंगालमध्ये जो नरसंहार चालू आहे तो पाहिल्या-नंतर थोडेसे लिहिल्याखेरीज रहावत नाही. शिवाजी महाराज स्वधर्मरक्षण

करित असता परधर्माचीही कदर करत होते. जमीनदारांविरुद्ध व जहागिरदारांविरुद्ध ते उभे राहिले व रयतेच्या काडीलाही स्पर्श करता कामा नये; रयतेने आपल्या मुलांप्रमाणे वाढविलेली झाडे, त्यांची फळे जमीनदारांनी किंवा जहागिरदारांनी तोडता कामा नयेत असे आदेश शिवाजीमहाराजांनी दिले. धर्मरक्षणाबरोबर गरीबांच्या अर्थरक्षणासाठीही ते उभे राहिले. भारताला सर्व धर्म सहिष्णुतेची व आर्थिक समतेची शिकवण त्यांनी दिली. ते मुस्लीमद्वेष्टे नव्हते एवढेच नव्हे तर त्यांनी मशिदींनाही इनामे दिली. आरमारात व सैन्यात मुसलमानांना चाकऱ्या दिल्या. मुसलमान सरदारांच्या सुंदर पत्नीला माता मानून गौरविले व सन्मानाने परत पाठविले. हे सर्व ३०० वर्षांपूर्वीच्या कालात जरी घडले, तरी आजहि भारत-पाकिस्तान यांच्या प्रश्नात शिवाजी महाराजांनी जे केले ते सर्व मार्गदर्शक ठरेल व आजच्या पूर्व बंगालच्या नरसंहाराच्या पार्श्वभूमीवर त्या थोर पुरुषाची थोरवी अधिकच प्रकर्षाने डोळ्यापुढे येईल.

' हिमालयाच्या शिखरां 'पैकी पुष्कळशा महान व्यक्तींचे जीवन १८५७ सालच्या स्वातंत्र्य युद्धानंतरचे व १९०० च्या दरम्यानच्या ३०-४० वर्षांच्या काळातील आहे. त्यावेळी देशामध्ये विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी इंग्रजी भाषेची थोरवी मान्य केली पण मराठी भाषाही तितकीच समृद्ध आहे हे आपल्या ' निबंधमाले 'द्वारे सिद्ध केले. मराठी भाषा वाटेल तो विचार, भावना व्यक्त करू शकते ही गोष्ट नवसुशिक्षितांच्या नजरेस त्यांनी आणून दिली. तो कालच असा होता की ज्यावेळी इंग्रजांचे राज्य हे आपणास वरदान आहे, त्यांची भाषा वाघिणीचे दूध आहे, आपला धर्म, आपली संस्कृति यापेक्षा पाश्चिमात्य आचार-विचार व संस्कृति श्रेष्ठ आहेत असे त्या वेळचे इंग्रजीतून शिक्षण झालेले सुशिक्षित लोक मानू लागले. ब्रिटिशांचे ते चांगले व आपले ते वाईट असा न्यूनगंड आपल्या मनात उत्पन्न झाला होता. अशा काळात भारतातील गीर्वाणभाषा व त्यातील ज्ञानभांडार, फारसी भाषेतील मौज, हिंदुस्थानी, गुजराथी

व इतर ज्येष्ठ भाषांचा मराठीशी संबंध, वाचण्यालायक नानाप्रकारची मनोरंजक पुस्तके, तऱ्हतऱ्हेच्या माहितीचे चमत्कारिक ग्रंथ, देशातील जुनी कविता व इतिहास, यांचा अभ्यास करण्याचा उद्योग पुढारी मंडळींनी करावा असे विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी लोकांना सांगितले. याच कालमध्ये आगरकरांनी सामाजिक समतेचा संदेश देशाला दिला. त्यांनी चौफेर हल्ला चढवला. ती श्राद्धे, ती पिंडदाने, ती वपने, ती सोवळी, ती ओवळी, तो शेंड्या—जानव्याचा, गंध—भस्माचा धर्म, ती थोतांडे यावर आगरकर विजेप्रमाणे आघात करू लागले. ते नेहमी म्हणायचे की हा देश सडलेला,ना बुद्धि ना विवेक रूढीग्रस्त, अज्ञानी, श्रेष्ठ कनिष्ठपणा, शिवाशिवी, स्त्रियांची दुर्दशा हे सर्व जोपर्यंत देशात चालू रहाणार तोपर्यंत या देशाला कुठले स्वराज्य मिळणार ? त्यांनी ' सुधारक ' सारखे वर्तमानपत्र चालविले व त्यातून सामाजिक सुधारणेच्या दृष्टीने आवश्यक ते सर्व प्रयत्न केले. याच कालात लो. टिळक म्हणू लागले की, सामाजिक सुधारणेची वाट पाहू लागलो तर आर्थिक शोषणाने देश मृतप्राय होईल. परके चोर प्रथम आपण घालवू व मग देश सुधारू. लो. टिळक ज्वलज्जहाल असे राजकारण देशास शिकवत होते. त्याच कालात आगरकर सामाजिक सुधारणांसाठी चळवळ करत होते. याच कालात स्वामी विवेकानंद आपल्या धर्माची थोरवी व सर्वधर्म समभाव शिकविण्याचे काम करत होते. स्वामी विवेकानंदांनी आपल्या जीवनामध्ये रामनवमी, गोकुळअष्टमी या दिवशी उपवास केले. त्याचप्रमाणे पैगंबराची जयंती व पुण्यतिथी या दिवशींही ते उपवास करीत. अमेरिकेतील सर्वधर्म परिषदेत ते म्हणाले की हिंदुधर्म विश्वधर्म होऊ शकेल; कारण तो ' माझ्यातच सत्य ' असे मानीत नाही. इस्लाम, ख्रिश्चनधर्म, या सर्वांत सत्यता आहे. सत्याचा बाह्य आविष्कार निराळा पण आतील गाभा एकच आहे. हिंदू धर्म ही गोष्ट ओळखतो. त्यांनी जसा हिंदू धर्माचा दिग्विजय सर्वधर्मपरिषदेत केला त्याप्रमाणेच विवेकानंद हे महान राष्ट्रनिर्मातेही होते, समतावादी होते. ' भारतमाता मला प्रिय — त्यातील पंडीत व शिकलेलेही मला प्रिय तितकेच अज्ञानी बंधूही मला

प्रिय. सुष्ट वा दुष्ट, ब्राह्मण वा चांडाळ सर्वांनाच मी हृदयाशी धरीन, सर्वांवर प्रेम करीन, ' असा मानवता धर्म ते आपल्या देशाला शिकवत होते.

याचकाळांत आर्थिक दृष्टीनेही देशाची जी पिळवणूक होत होती त्यासाठी स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षणाची चतुःसूत्री काँग्रेसने देशाला दिली. शाळा, विद्यालये काढून राष्ट्रीय शिक्षण देण्याचाही प्रयत्न झाला. याच कालात न विसरता येण्यासारखे सशस्त्र क्रांती करणारे थोर पुरुषही जन्माला येऊन फासावर लटकले. हा काल म्हणजे महाराष्ट्राच्या ' रेनेझान्स 'चा काल मानला पाहिजे.

१९२० पासूनचा पुढील काल ज्यात सुभाषचंद्र बोस, बाबासाहेब आंबेडकर, राजेंद्रबाबू, चित्तरंजनदास, महर्षि कर्वे, लाला लजपतराय, सरदार भगतसिंगादि लोक आपली कीर्ति मागे ठेवून काम करून गेले, त्याच कालात म. गांधींनी असहकारितेच्या व सत्याग्रहाच्या चळवळी केल्या. चित्तरंजन दास यांच्यासारखा थोर कायदेपंडित हा त्यागी जीवन जगू लागला. याच कालात जालियनवाला बागेचे हत्याकांड झाले. सरदार भगतसिंगाने सॅण्डहर्स्टचा खून केला व आपल्या शेवटच्या जबानीत सांगितले, बाँब टाकून शासनपद्धतीचा सक्रीय विरोध आम्हास करावयाचा होता; आम्ही मानवीजीवन पवित्र मानतो. मानवाच्या सेवेसाठी आम्ही प्राण देऊ. राजकीय स्वातंत्र्यासाठी निःस्वार्थ हिंसा ही हिंसा होत नाही, गुलाम राष्ट्राला सशस्त्र संघटित क्रांती करण्याचा हक्कच आहे. याच कालात हुतात्मा जतीन्द्रदास यांनी ६१ दिवसांचा उपवास करून आपले प्राण सोडले. राजकीय कैद्यांना जेलमध्ये सन्मानाने वागवले गेले पाहिजे यासाठी त्यांनी आपल्या प्राणाची आहुती दिली. हा काल स्फूर्तीदायक आहे. इतकेच नाही तर सर्व देशात यावेळी पुरुषार्थ जागृत झाला व इंग्रजांचे राज्य खिळखिळे करण्यात आले. राष्ट्रात निर्भयता उत्पन्न झाली व प्राण पणाला लावून देशासाठी आत्मबलिदान करणारे हजारो युवक या कालात पुढे आले.

रवींद्रनाथ टागोरांचा वर जरी उल्लेख आला नसला तरी त्यांचे कर्तृत्व भारताच्या रेनेझान्स कालातच चमकले. त्यांची स्वप्ने महान होती. 'मानवता' हा माझ्या काव्याचा आत्मा आहे असे ते म्हणत. सर्व धर्म आणि मानव-वंश यांना एकत्र नांदवून भारत मानवतेचे तीर्थक्षेत्र बनेल अशी त्यांची श्रद्धा होती. याच कालात अरविंद घोष हेही आपली तपस्या, साधना करीत होते. अरविंदांवर खटला चालला असताना चित्तरंजन दास यांनी त्यांच्या-विरुद्ध जो पुरावा होता त्याच्या चिंध्या उडवल्या व समारोप करताना म्हटले, " राजकीय वादाची धूळ खाली बसेल. अरविंदांची कीर्ति सात-समुद्रापलीकडे जाईल. राष्ट्रीयवृत्तीचा महान कवी, देशभक्तीचा उद्‌गाता, नवसंदेशाचा ऋषी, म्हणून अरविंदांना पुढे ओळखले जाईल. "

श्री. हरिभाऊ लिमये यांनी ' हिमालयाची शिखरे ' हे पुस्तक मुख्यतः कुमार वाचकांसाठी लिहिले आहे. यापूर्वी त्यांनी स्वर्गस्थ साने गुरुजींच्या विचाराचे दर्शन घडविणारे ' स्वप्न आणि सत्य ' हे पुस्तक संपादित केले. ते पुस्तक तात्त्विक स्वरूपाचे आहे. ' हिमालयाची शिखरे ' हे पुस्तक फक्त कुमारांनाच प्रेरणा देणारे होईल असे नव्हे, विचारवंतांनाही त्यांतून प्रेरणा मिळेल अशी मला खात्री आहे. ' हिमालयाची शिखरें ' हे पुस्तक वाचत असताना शेदीडशे वर्षातील कालाचा धावता चित्रपट आपल्या डोळ्यांपुढून जातो. आजच्या नवीन पिढीला स्फूर्ति देणारा हा काल आहे. त्याची थोडी फार कल्पना वरील प्रस्तावनेतून वाचकांना येऊ शकली व त्यामुळे त्याकालातील वेगवेगळ्या धार्मिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय चळवळींचा संगतवार अभ्यास करण्याची इच्छा जर नवीन पिढीत निर्माण झाली, तर स्वर्गस्थ साने गुरुजींनी जी एकदीड वर्षाच्या कालात पुण्यस्मरण म्हणून प्रभावी व पराक्रमी व्यक्तींची ओळख करून दिली व जी ओळख ' हिमालयाची शिखरे ' या द्वारे वाचकांना आज होत आहे, तिचे योग्य सार्थक झाले व श्री. हरिभाऊ लिमये यांचा प्रयत्न सफल झाला असे म्हणणे योग्य होईल.

हरिभाऊ लिमये यांनी संपादित केलेल्या या पुस्तकाचा, गेल्या शेसव्वाशे वर्षांच्या कालांतील स्फूर्तिप्रद जीवनाचे चित्र डोळ्यासमोर उभे करण्याच्या दृष्टीनें आणि त्याचे चिंतन करण्याच्या कामीं मला उपयोग झाला. मी हरिभाऊंचे त्याबद्दल आभार मानतो.

**– अण्णासाहेब सहस्रबुद्धे**

पुण्यश्लोक
श्री शिवराय

वैशाख शुद्ध द्वितीयेस पुण्यश्लोक श्री शिवरायांचा जन्म-दिवस.

त्यांचें नांव स्फूर्तीचा अखंड झरा आहे. महाराष्ट्रांत संतांनी त्यागाचें, समतेचें एक वातावरण निर्माण केलें होतें. शिव-छत्रपतींनी हे गुण राष्ट्राच्या कामीं लावून स्वराज्याची स्थापना केली. इतिहासनिर्मितींत अनेक शक्ति काम करीत

असतात. सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय— नाना शक्तींच्या क्रिया प्रतिक्रिया होत असतात. त्यांतील एखाद्या शक्तीलाच प्रधान मानणें चूक ठरेल. शिवाजी महाराजांनीं हें सर्व ओळखलें होतें हा त्यांचा मोठेपणा.

हिंदुस्थानांत नाना धर्म. परंतु जोंवर कोणी कोणावर जुलूम करीत नसतो तोंवर प्रश्न नसतो. अरब व ख्रिश्चन लोक मलबार किनाऱ्यावर कधींपासून येऊन राहिलें होते; व्यापार करीत होते. भारतीयांनीं त्यांना राहूं दिलें. परंतु पुढें मुसलमानी धर्म राजसत्ता घेऊन आला. आणि देशभर लढाया सुरू झाल्या. हिंदूंचीं मंदिरें उद्ध्वस्त करणें, बाटवाबाटवी असे प्रकार होऊं लागले. याला आळा घालणें जरूर होतें. परंतु मुसलमानी धर्म केवळ तलवारीनें थोपवता आला नसता. त्यांतील समता तुम्ही न घ्याल तर मराल. हिंदुस्थानातील कोटचवधि मुसलमान केवळ बाटवाबाटवीनें झालेले नाहीत. जातीच्या जाती, ज्यांना आपण तुच्छ मानीत असूं त्या मुसलमानी धर्मांत गेल्या. पूर्व बंगालमध्यें हरिजनांच्या नावेंत स्पृश्य हिंदु परवांपरवांपर्यंत बसत नसत. तोच मुसलमान झाला तर त्याच्या नावेंत हे स्पृश्य बसत. आपणच आपल्या बांधवांना दूर लोटलें. समर्थांनीं अकराशे मठ स्थापून लोकजागृतीचें काम केलें असेल. परंतु ते पुन्हां वर्णधर्मांतील श्रेष्ठाश्रेष्ठता राखूं इच्छित होते. चातुर्वर्ण्याच्या चौकटीच्या बाहेर ते जाऊं इच्छित नव्हते. म्हणून तर मराठ्यांचें राज्य गेलें. आम्ही एकीकडे हिंदुस्थानभर दौडत होतो आणि आंतून जातिभेदांनीं पोखरले जात होतो. पानपतच्या लढायीच्या वेळेस मराठ्यांच्या छावणींतला सर्वत्र पसरलेला धूर पाहून

अहमदशहा अबदाली म्हणाला, " मराठ्यांच्या छावणींत का आग लागली ? " कोणी सांगितलें, " अलग अलग भाकऱ्या भाजण्याचे हे चुले आहेत. " अबदाली म्हणाला, ' तर विजय आपला आहे ! "

शिवाजी महाराजांच्या वेळेस संतांनीं निर्माण केलेली समता जिवंत होती. परंतु हा समतेचा घोष उत्कटत्वानें पुढें कोणी घोषविला ? अभंग ओंठावर राहिले. समता वाळवंटांतून पुढें मंदिरांत नेली नाहीं, घरींदारीं, विहिरीवर नेली नाही. कशाला टिकतील राज्यें ?

शिवाजी महाराजांनीं धर्मावर होणारें मस्लीम आक्रमण थांबविलें. परंतु हिंदुधर्मांतीलच एकमेकांवर होणारें आक्रमण थांबविणारा कोणी झाला नाहीं. शिवाजी महाराजांचा संदेश, संतांचा संदेश कोणी पुढें नेला नाहीं.

शिवाजी महाराजांचें चरित्र अनंतरूप आहे. मुसलमानांचें बंड त्यांनीं मोडलें, परंतु ते मुस्लीम द्वेष्टे नव्हते. सूडबुद्धि त्यांच्याजवळ नव्हती. त्यांनीं मशिदी पाडून मंदिरें केलीं नाहीत. मशिदींनाहि इनामें दिलीं. एवढेंच नव्हे तर मुसलमानांसहि नोकऱ्या चाकऱ्या देत. आरमारांत मुसलमान होते. एवढेच नव्हे तर अफजुलखानाच्या भेटीस जातांना छत्रपतीच्याबरोबरच्या शरीर-रक्षकांत एक मुसलमानहि होता. मुसलमान सरदाराची सुंदर पत्नी त्यांच्यासमोर कैद करून आणण्यांत आली तर त्यांनी तिला माता मानून गौरविलें. मराठ्यांनी ही वृत्ति पुढेंहि टिकविली होती. अजमेरचा प्रसिद्ध दर्गा मोडकळीस आलेला। मराठ्यांनी दुरुस्त करून दिला. भारताला आज या वृत्तीची गरज आहे.

४ शिवाजी महाराज म्हणजे केवळ मुस्लीमद्वेष असें समीकरण मांडणाऱ्यांस शिवाजी महाराज मुळींच समजले नाहीत.

परंतु केवळ धर्मावर होणाऱ्या आक्रमणासाठीं शिवाजी-महाराज उभे असते तर यशस्वी झाले असते असे नाहीं. धर्मरक्षणाबरोबर गरिबांच्या अर्थरक्षणार्थहि ते उभे राहिले. शिवाजी महाराज काळाच्या पुढें होते. युरोपांत प्रॉटेस्टंट व कॅथॉलिक एकमेकांच्या कत्तली करीत होते तेव्हां शिवाजी महाराज स्वधर्माचें रक्षण करीत असतां परधर्माचीहि कदर करीत होते. याबाबतींत ते ज्याप्रमाणें काळाच्या पुढें होते त्याचप्रमाणें आर्थिक धोरणांतहि पुढें होते. जमीनदारांविरुद्ध, जहागिरदारांविरुद्ध ते उभे राहिले. बखरींत वाक्य आहे कीं, गढीवाला सरदार असे. सारा गांव जणूं त्याचा गुलाम. त्याचे घोडे वाटेल तेथें चरायचे. तो वाटेल त्याच्या झाडावरचीं फळें तोडून आणील. परंतु शिवाजी महाराजांच्या आज्ञा-पत्रांत पुढील अर्थाचें वाक्य आहे, “ रयतेच्या काडीला स्पर्श करतां कामा नये. रयतेनें पोटच्या पोरांप्रमाणें वाढविलेलीं झाडें, त्यांचीं फळें नेता कामा नये. ” असा शिवाजीमहारा-जांचा दंडक होता. लंगोटचा मावळचांसाठीं ते उभे होते. सरदारजहागिरदारांनीं जनतेला निस्त्राण केलें होतें. यांचें बंड कोणी मोडायचें ? शिवाजीमहाराजांची ही दृष्टि पुढील लोकांजवळ राहिली नाहीं.

भारताला सर्वधर्मसहिष्णुतेची व आर्थिक समतेची अशी ही शिवछत्रपतींची दुहेरी दृष्टि आज हवी आहे. छत्रपतींची ही द्विविध दृष्टि ज्याला कळली नाही त्यानें त्या थोर पुरुषांचें नामोच्चरण करणें व्यर्थ होय.

देशभर हा द्विविध संदेश आज घुमवायला हवा आहे. भारतांत कोणत्याहि धर्माचे असा. गुण्यागोविंदानें नांदा. हा सर्व धर्मसमभाव आज उत्कटतेनें पुकारणें सर्वांचें कर्तव्य आहे. त्याचप्रमाणें भारतांतील जमीनदारीचेंहि उच्चाटन व्हायला हवे आहे. सर्वधर्मसमभावाची प्रचंड लाट उठवून जात्यंधांची द्वेषाग्नि आग आपण विझविली पाहिजे व जमीनदारी नष्ट करून कम्युनिस्टांची नांगी ढिली केली पाहिजे. हें जो करील तो शिवाजीमहाराजांचा वारसदार !

शिवाजी महाराजांचें भव्य जीवन डोळ्यांसमोर आलें म्हणजे शतविचार स्फुरतात. परंतु आजच्या भारतीय परिस्थितींत त्यांच्या चरित्रांतील सर्वधर्मसहिष्णुता व गरिबांची आर्थिक स्थिति सुधारण्याची तळमळ या दोन गोष्टी सूर्यप्रकाशाप्रमाणे डोळ्यांसमोर उभ्या राहतात. हीं दोन ध्येयें नवभारताच्या पुरोगामी तरुणांस हांका मारीत आहेत. जे ऐकतील, ते स्वतः तरून राष्ट्रास तारतील; जे ऐकणार नाहींत व आंधळेपणानें वेडेवांकडें करीत बसतील ते स्वतः माणुसकीस मुकतीलच परंतु या महान राष्ट्रालाहि विनाशाच्या गर्तेत लोटतील. म्हणून सावधान !

✦ ✦ ✦

卐

## विश्वैक्यमूर्ति विवेकानंद

४ जुलै ही स्वामी विवेकानंदांची पुण्यतिथि.

१९०४ मध्यें स्वामी निजधामास गेले. चाळिसी संपली तोंच हा महापुरुष आपला दिव्य संदेश सांगून पडद्याआड गेला. विवेकानंदांचें मूळचें नांव नरेंद्र. विवेकानंद हें नांव त्यांनी पुढें घेतलें. ते लहानपणापासून विरक्त वृत्तीचे. नवीन धोतर भिकाऱ्याला त्यांनीं दिलें. अति बुद्धिमान् नि खेळकर.

तालीम करायचे. उत्कृष्ट गाणारे नि वाजविणारे. तरुणांचे पुढारी असायचे. कॉलेजमध्यें सारे ग्रंथ वाचून काढले.

त्या वेळेस केशवचंद्र सेन, रविंद्रनाथांचे वडील देवेंद्रनाथ वगैरे प्रसिद्ध मंडळी होती. त्यांची व्याख्यानें विवेकानंद ऐकत. त्यांनी या दोघांना, "तुम्ही देव पाहिला आहे का ?" म्हणून विचारले. दोघांनी नकार दिला आणि याच वेळेस स्वामी रामकृष्ण परमहंसांची नि त्यांची गांठ पडली. नरेंद्राला बघतांच रामकृष्णांची जणूं समाधि लागली. "तुम्ही देव पाहिला आहे ?" या प्रश्नाला "हो पाहिला आहे. मी तुझ्याजवळ बोलत आहे त्याहूनहि अधिक आपलेपणानें मी त्याच्याजवळ बोलतो," असे रामकृष्णांनी उत्तर दिलें. विवेकानंद आरंभी पक्के नास्तिक. "Let Mr. God come and stand before me तो राजश्री ईश्वर कोठे असेल तर त्याने यावे माझ्यासमोर," असें तें म्हणायचे. परंतु रामकृष्णांनी त्यांच्या जीवनांत क्रांति केली. निराळी साधना सुरू झाली.

पुढें रामकृष्ण परमहंस देवाघरीं गेले. मरावयाच्या आधीं ते विवेकानंदांस म्हणाले, "माझी खरी साधना मी तुला देत आहे." महापुरुषानें जणूं मृत्युपत्र केलें.

रामकृष्णांच्या साधनेला तुलना नाही. देव मिळावा म्हणून त्यांची केवढी धडपड ! अहंकार जावा म्हणून भंगी बनले, स्त्री-पुरुष भेद जावा म्हणून स्त्रीचा पोषाख करून वावरले. एक दिवस गेला कीं रडत रडत देवाला म्हणायचे, "गेला एक दिवस नि तू आला नाहीस." धनाची आसक्ति जावी म्हणून एका हातांत माती नि एका हातांत पैसे घेत नि म्हणत होहि

मातीच आहे आणि गंगेंत फेकीत. अशी ही अद्भुत साधना अनेक वर्षांची. परमेश्वराचा साक्षात्कार सर्व धर्माच्या द्वारा त्यांनी करून घेतला. मशिदींतहि त्यांना प्रभु भेटला. चर्चमध्येंहि भेटला. सर्वधर्मसमन्वय त्यांनी केला. सर्व धर्म सत्य आहेत, ईश्वराकडे नेणारे आहे तसे त्यांनी अनुभवून सांगितले. स्वामी विवेकानद रामनवमी, गोकुळअष्टमी या दिवशीं उपवास करीत; त्याप्रमाणे पैगंबराची जयंती, पुण्यतिथी या दिवशींहि उपवास करीत. हिंदुधर्म सर्व धर्मांना आदरील. अमेरिकेंतील सर्व धर्म परिषदेंत ते म्हणाले, "हिंदुधर्म विश्वधर्म होऊं शकेल. कारण तो माझ्यांतच सत्य असें मानीत नाही. इस्लाम, ख्रिश्चन धर्म, सर्वांमध्यें सत्यता आहे असे तो मानतो. सत्याचे बाह्य आविष्कार निराळे. आंतील गाभा एकच. हिंदुधर्म ही गोष्ट ओळखतो." "एकं सत् विप्रा बहुदा वदंति" हें महान ऐक्यसूत्र हिंदुधर्मानें शिकविलें. जगांत सर्वत्र द्वेषमत्सर. एकीकडे दुनिया जवळ येत आहे, तर हृदयें मात्र दूर जात आहेत. अशावेळेस तुमचा सर्वांचा आत्मा एकच आहे अशी घोषणा करणारा प्रबळ पुरुष हवा होता. ही घोषणा अमेरिकेंत शिकागो येथें स्वामींनी केली. या सर्व धर्म परिषदेंत स्वामींची आधीं दाद लागेना. परंतु एके दिवशीं त्यांना संधि मिळाली. भगव्या वस्त्रांतील ती भारतीय मूर्ति उभी राहिली. आणि "माझ्या बंधु भगिनींनो," असे पहिलेच शब्द त्या महापुरुषाने उच्चारले आणि टाळ्यांचा गजर थांबेना. कां बरें? त्या दोन शब्दांत कोणती जादू होती? त्यांच्या आधीं जे जे व्याख्याते बोलून गेले ते सारे "Ladies and Gentlemen–सभ्य स्त्रीपुरुष हो"–अशा

शब्दांनी आरंभ करीत. परंतु ही विश्वैक्याची मूर्ति उभी राहिली. सर्वत्र एकता अनुभवणारे ते डोळे, आपलीच आत्मरूपें पाहणारे ते डोळे. प्रेमसिंधूंत बुचकळून वर आलेले ते शब्द ! त्या दोन शब्दांनीं अमेरिकन हृदय जिंकून घेतलें. आणि मग तें अपूर्व व्याख्यान झालें. स्वामीजी विश्वविख्यात झाले.

आणि भारताचा विजयी सुपुत्र घरीं आला. मायभूमीनें अपूर्व स्वागत केलें. विवेकानंद धर्ममूर्ति होते. परंतु त्यांचा धर्म रानावनांत जा सांगणारा नव्हता. सभोंवती दुर्दशा असतांना हिमालयांत कोठें जायचें ? महान् फ्रेंच साहित्यिक रोमारोलां याने विवेकानंदांवर एक ग्रंथ लिहिला आहे. त्यांत तो म्हणतो, "Vivekanand was first a nation builder then a religious reformer" विवेकानंद हे आधीं राष्ट्रनिर्माते होते. मग धर्मसुधारक होते. विवेकानंदांचा धर्म राष्ट्राची उभारणी हा होता. भारतावर त्यांचें अपार प्रेम. ते म्हणतात, "माझ्या बालपणाचा पाळणा म्हणजे ही भारतभूमि, माझ्या तरुणपणांतील उत्साहाची, आशा आकांक्षांची कर्मभूमि म्हणजे भारतभूमि, आणि माझ्या उतारवयांतील मोक्षाची वाराणसी म्हणजे हीच भारतमाता. तिचे सारें सारें मला प्रिय आहे. ये पंडिता, तू मला प्रिय आहेस, कारण तू भारताचा आहेस. आणि ये अज्ञानी बंधो, तूहि ये, मला प्रिय आहेस कारण तू भारताचा. सुष्ट वा दुष्ट, ब्राह्मण वा चांडाळ, सारे सारे मला प्रिय. सर्वांना मी हृदयाशीं धरीन. सर्वांवर प्रेम करीन."

भारताची दुर्दशा पाहून कासावीस होत. एकदा अमेरिकेंत

 कोटयाधीश कुबेराकडे ते होते. रात्रीं सुंदर पलंगावर ते निजले होते. तेथलें तें वैभव, तो थाटमाट आणि स्वामीजींना झोप येईना. त्यांना सारखें रडूं येत होतें. उशी भिजून गेली. तो पलंग त्यांना निखाऱ्याप्रमाणे वाटू लागला. ते जमिनीवर झोपले. सकाळीं मित्रानें विचारलें, "उशी ओलीचिंब कशानें ?" "मी रात्रभर रडत होतो. अमेरिकेंत केवढें वैभव. आणि भारतांत पोटभर खायलाहि नाहीं." ते एका पत्रांत लिहितात, "आपण हिंदुस्थानांत पाप केलें. त्या पार्थसारथी गोपालकृष्णाच्या भूमींत स्त्रियांची, अस्पृश्यांची पशूहूनहि वाईट स्थिति आपण केली आहे." अमेरिकेंतील लोकांना ते म्हणायचे "कृपा करून हिंदुस्थानला मिशनरी नका पाठवू. मोठमोठीं धर्म तत्वें आईच्या दुधाबरोबर तेथें मुलांना मिळतात. रस्त्यांतील भिकारी महान् धर्मतत्वें सांगणारीं गाणीं म्हणत जातात. मूठभर भिक्षा घेऊन सर्व भारतभर उदारधर्म पसरवीत असतात. भारताला तुम्ही संसार सुंदर करणारें विज्ञान, पोटभर जगता येईल असें धंदेशिक्षण द्या."

मार्गरिट ई नोबल ह्या इंग्रजीबाई विवेकानंदांना लंडनमध्यें भेटल्या. "मी तुमच्या देशासाठीं काय करू शकेन ?" असे त्या ब्रह्मचारिणी विदुषीनें विचारलें. विवेकानंद म्हणाले, "माझ्या देशांतील मायभगिनींस शिकवायला या. कलकत्त्यांत एखादी स्त्रियांची शाळा काढा." आणि निवेदिता देवींनी कलकत्त्यास येऊन शाळा काढली. विवेकानंदांनीं १८९९ मध्यें रामकृष्ण मिशन संस्था काढली. स्वतःच्या मोक्षा-साठीं व जगाच्या हितासाठीं ही संस्था होती. किंबहुना

जगाच्या हितांतच स्वतःचा मोक्ष असे ही संस्था सांगत आहे. विवेकानंद बेलूर मठांत संन्यासधर्मावर बोलतांना म्हणाले, "संन्यास म्हणजे मरणावर प्रेम. रोज परसेवेंत झिजायचें, तिळतिळ मरायचें. अशा मरणांत मोक्ष असतो. देहाची आसक्ति नष्ट करणे, बारिक सारिक कर्मांतसुद्धा त्यागाची भावना जागृत ठेवणें म्हणजे संन्यास. एखाद्या क्षणीं अत्युच्च विचारांत रममाण होऊन सारें वैभव तृणवत् दूर फेंकाल तर दुसऱ्या क्षणीं कचऱ्याची टोपली उचलून सारें स्वच्छ कराल."

सेवेच्याद्वारा त्यांना मोक्ष हवा होता. निरपेक्ष, निरहंकारी सेवा. एकदा एक मुमुक्षु त्यांच्याकडे येऊन म्हणाला, "मी दारें खिडक्या बंद करतो. जप करतो. तरी देव भेटत नाही." तेव्हा म्हणाले, "दारें खिडक्या सताड उघडी टाक. तुझ्या खिडकीखालून रोज शेकडों प्रेतें जात आहेत बघ. शहरांत साथी आहेत. त्यांची सेवा करायला जा. औषध दे. रस्ते, गटारें स्वच्छ कर." स्वतः स्वामी प्लेगच्या नि कॉलऱ्याच्या दिवसांत कलकत्त्यांत मित्रांसह सेवा करीत होते. कोणी विचारलें, "पैसे खुंटले तर ?" स्वामी म्हणाले, "बेंलूरचा मठ विकीन. तेथील जमीन विकीन." त्यांना आसक्ति कसलीच नसे. महात्माजींनी हरिजन आश्रम नाहीं देऊन टाकला ? महापुरुष वृत्तीनें मुक्त असतात, अनासक्त असतात.

दरिद्री नारायण हा महान् शब्द प्रथम विवेकानंदांनी उच्चारला. "नारायण हवा असेल तर दरिद्र बांधवांची सेवा कर. आज नारायण दरिद्र आहे. जा त्याला सुखी कर."

 महात्माजींनी हा शब्द सर्वत्र नेला. ते जेव्हां दानार्थ हात पसरीत तेव्हां, " दरिद्र नारायणके वास्ते " असें म्हणत.

विवेकानंदांना रडगाणें माहित नव्हतें. ज्ञान–वैराग्याचा, अगाध ब्रह्मचर्याचा तो अद्भुत पुतळा ! सामर्थ्याचे ते सिंधु होते. ते सिंहाच्या छातीचे होते. ते नेहमी म्हणत, " मला एक हजार माणसे द्या. ती सिंहाच्या छातीचीं मात्र असूं देत. मग भारताचा कायापालट मी करीन. " " वेदांत तुम्हाला सांगतो कीं तुमच्यांत तो परमात्मा आहे. त्याची चित्कळा, त्याचा अंश तुमच्यांत आहे. मग तुम्ही खालीं मान घालून कां बसतां ? उठा नि पराक्रम करा. हिंदुधर्मांत नाना भ्रष्ट गोष्टी शिरल्या. आपण पापी पापी म्हणत बसलो. हिंदुधर्मानें हें दुबळेपणाचें तुणतुणें कोठून आणलें ? तें मोडून तोडून फेका. चिदानंद-रुप शिवोऽहम ही तुमची घोषणा असूं दे. नायमात्मा बलहीनेन लभ्यः–दुबळ्याला कोठला आत्मा ? उपनिषदांचा अभ्यास तेजस्वी बनवितो, नेभळट नाहीं बनवित. तुमचा स्वतःवर विश्वास आहे कीं नाही बोला. ज्याचा स्वतःवर विश्वास नाही त्याचा देवावर तरी कोठून असणार ? रडक्या दुबळ्या आस्तिकापेक्षां स्वतःच्या कर्मशक्तीवर जगणारा नास्तिक बरा ! "

स्वामींची अशी जळजळीत वाणी आहे. ते एकदा बंगाली तरुणांस म्हणाले, " तुम्हाला देव पाहिजे ? जा फुटबॉल खेळा. हंसू नका. बलवान बना, उत्साही बना. लाथ मारीन तेथें पाणी काढीन ही शक्ति हवी. " स्वामीजींनी मृतवत् पडलेल्या राष्ट्राला वीरवाणी ऐकवली.

त्यांची कीर्ति जगभर गेली. कलकत्त्यांत त्यांचें अपार स्वागत

झालें. हत्तीवरून मिरवणुक. तों गर्दीत त्यांना बालपणचा लंगोटी मित्र दिसला. त्यांनी एकदम खाली उडी मारली नि त्या मित्राला कडकडून भेटले. 

भारताचा मोठेपणा कशांत आहे यासंबंधी ते म्हणतात, "या देशानें कधीं कोणावर आक्रमण केलें नाहीं हा या देशाचा मोठेपणा असें मला विचार करतां वाटूं लागतें." सर्व धर्मांचा, संस्कृतींचा मेळ घालणें, जगाला प्रेमधर्मानें रहायला शिकवणें हें भारताचे कर्तव्य आहे. ते म्हणतात, "समता उत्पन्न करायची असेल तर विशेष हक्क नाहीसे व्हायला हवेत. हे विशेष हक्क नष्ट व्हावेत म्हणून व्यक्तीनेच नव्हे, एखाद्या राष्ट्रानेंच नव्हे तर साऱ्या जगानें खटपट केली पाहिजे. पैशाचे दोन पैसे कसे करावे ही अक्कल एखाद्याच्या अंगी उपजत असणें स्वाभाविक आहे. परंतु तेवढयानें गोरगरिबांस खुशाल तुडवण्याचा हक्क त्याला प्राप्त होतो कीं काय? श्रीमंत आणि गरीब यांच्यांतील तेढ विकोपास जाऊं पहात आहे. आपल्या अंगांतील विशेष गुणांचा उपयोग दुसऱ्याला नाडण्याकडे करणें ह्यालाच विशिष्ट हक्क म्हणतात. हे राक्षसी नष्ट करण्याकडे त्या त्या काळांतील लोक लढत असतात. नीतिशास्त्राचा हाच रोख असतो. आपणहि हे विशेष हक्क नष्ट करू तर विविधता राहूनहि, त्या त्या विशेष गुणांना वाव राहूनहि ऐक्य प्रवृत्ति वाढेल, साम्यावस्था वाढेल."

✦ ✦ ✦

卐

## लोकमान्य टिळक

" यदा यदा हि धर्मस्य " हा श्लोक उच्चारीत लो. टिळक एक ऑगस्ट १९२० रोजीं देवाघरीं गेले.

लोकमान्य, आज अधिकच तीव्रतेनें तुमची आठवण होत आहे. तुमच्या थोर चारित्र्याची आज राष्ट्राला अतिशय आवश्यकता आहे. तुमचें जीवन अनंत गुणांची खाण.

परंतु त्यांतील सत्याची उपासना आज अधिकच ोळ्यां-

समोर येते. दत्तक बाळ जगन्नाथ महाराजांच्या इस्टेटीचे 
तुम्ही एक विश्वस्त. एकदां त्यांच्या मळ्यांतील भाजी तुमच्या घरीं आली. तुम्ही विचारलेंत, " ही भाजी कोठली ? " कोणीतरी सांगितलें कीं त्या मळ्यांतील. तुम्हीं म्हणालांत, " ही भाजी परत करा. स्वर्गीय मित्रानें या इस्टेटीसाठीं मला विश्वस्त नेमलें. तेथील भाजी मी कशी घेऊं ? "

लोकमान्य, ही सचोटी, ही दानत तुमच्या या प्रियतम देशाजवळ आज राहिली नाही. हिंदुस्थानभर गेली सात-आठ वर्षें काळाबाजार शब्द रूढ झाला आहे. तो जणूं राष्ट्राचा धर्म बनत आहे. एकमेकांना फसवणें यांत पुरुषार्थ वाटत आहे. परदेशांतहि वाईट माल पाठवून व्यापारी तुमच्या या महान् राष्ट्राचें नांव कलंकित करीत आहेत.

महापुरुषा, तुझ्या आत्म्याला क्लेश होत असतील. भ्रष्ट जनता बघून तुला वेदना होत असतील. तुझ्या स्मरणानें ही भ्रष्टता जावो. श्रीमंत वा गरीब, लहान वा थोर, सर्वांच्या जीवनांत सार्वजनिक नीति येवो, सत्य येवो.

लोकमान्य, या राष्ट्राला राष्ट्रीयता तुम्ही शिकवलीत. बंगालच्या फाळणीच्या वेळेस कांहीं पुढारी म्हणत होते कीं बंगालचें दुःख; बंगालनें बहिष्कार पुकारावा, स्वदेशी व्रत घ्यावें. परंतु तुमची अमोघ वाणी बोलली, " बंगालचें दुःख, तें का आपलें नाही ? हें सारें राष्ट्र एक आहे. एकाचें दुःख तें सर्वांचें. सर्वांचें एक हृदय. " सारा देश तुम्ही वंगभंगाच्या अन्यायाविरुद्ध उभा केलात. ही तुमची शिकवण.

परंतु आज आम्ही प्रांतीय वाद माजवीत आहोंत. त्याच्या-साठीं सत्याग्रहाची भाषा बोलत आहोत. वाटींतील सांडलें

 तरी ताटांतच ना ? एक ना देश ? सामोपचारानें नाहीं का सीमा ठरवतां येणार ?

लोकमान्य, तुमची स्मृति आम्हाला सन्मार्ग दाखवो, सद्व्यवहार शिकवो.

स्वराज्यासाठीं तुम्ही जीवनाचा होम पेटवला. सारे बौद्धिक आनंद दूर ठेवलेत. वेद, गीता, उपनिषदे, सारे वाचावयाला तुरुंगांत वेळ. बाहेर स्वातंत्र्याचा ध्यास.

महापुरुषा, जें स्वातंत्र्य, जें स्वराज्य तुझ्या डोळ्यांसमोर होतें तें गोरगरिबांचें होतें. तुला सहा वर्षांची सजा होताच मुंबापुरीचे लाखो कामगार बाहेर पडले. गोळीबार झाले. गरीब ओळखत होते कीं हा आमची आशा आहे. रायगडच्या उत्सवांत मावळ्यांना आग्रहानें जेवूं वाढणाऱ्या, शेतकरी, कामगार, दरिद्री श्रमणारी जनता यांच्याविषयीं तुला अपार प्रेम. साबरमतीच्या तुरुंगांत अधिकारी म्हणाला, "एवढे तुम्ही विद्वान् तुरुंगांत भाकर खाणार ?" तुम्ही म्हणालांत "मला येथें पोटभर भाकर तरी मिळेल. माझ्या कोटयवधि बांधवांना भाकरहि मिळत नाही." तुमचे ते शब्द हृदयाला स्पर्श करतात. तेल्यातांबोळ्यांचे पुढारी म्हणून तुला हिणवीत. परंतु तेंच भूषण, तोच तुझी पदवी. मंडालेच्या तुरुंगांतून गीता रहस्य आणलेंत आणि कोणाला अर्पण केलेंत ? —श्रीशाय जनतात्मने ! जनता हा तुमचा परमेश्वर होता. त्याला तो महान् ग्रंथ तुम्ही समर्पिलात.

जनताजनार्दनाची सेवा करणाऱ्या महापुरुषा, तो जनताजनार्दन आमचेहि दैवत बनो. त्याला सुखी, समृद्ध करण्यासाठीं, आमची धडपड असो. मिळालेलें स्वराज्य सर्वांना

संधी देईल, सर्वांची ददात दूर करील, तेव्हांच तुझा महान् आत्मा शांत होईल.

कर्मयोगाची शिकवण तूं दिलीस. देशसेवा हीच स्नानसंध्या मानलीस. स्वातंत्र्य मिळेपर्यंत अविरत प्रयत्न हवेच होते. परंतु स्वातंत्र्य मिळाल्यावर तर उद्योगाची अधिकच जरुरी. आज कोटयवधि हात काम करण्यासाठीं सरसावले पाहिजेत. ही सस्यशामल भूमि, जगाला अन्नवस्त्र पुरवणारी ही अन्न-पूर्णा आज अन्नवस्त्रहीन आहे. आम्ही का करंटे ? स्वराज्यांत का आम्ही उपाशी मरणार? गांवोगांवची सारी जनता उठूं दे. जेथें म्हणून काहीं पिकवता येईल तें पिकवूं दे. इंग्लंडमध्यें आज फरसबी, कोबी, इत्यादि भाज्या अधिक खाऊन लोक जगत आहेत, स्वावलंबी होत आहेत. आम्हांला का तें शक्य होणार नाही ?

तुमच्या कर्मयोगाचा परीस आमच्या हातांत येऊं दे. पुन्हां भारताला सुवर्णभूमि करूं दे. उद्योग, रात्रंदिवस उद्योग ! कामांत चुकारपणा नको.

सरकारजवळून विहिरीसाठीं, बैलासाठीं, शेतीसाठीं तगाई घेतलीत, कर्ज घेतलेंत तर तें प्रामाणिकपणें त्यांत खर्च करा. हिंदी जनते, स्वतःची नि राष्ट्राची वंचना करूं नकोस. शेतकऱ्या पिकव, अधिक पिकव. कामगारा, अधिक उत्पन्न कर. संपच आला तर निरुपाय. परंतु जोंवर कामगार आहात तोवर प्रामाणिक रहा. अप्रामाणिकपणाची संवय राष्ट्राचा नाश करील. पांढरपेशांनो, तुम्हीहि श्रमा, श्रमजीवनाशीं समरस व्हा. आपण सारे एक. कोणी कचेरींत असा, कोणी कारखान्यांत असा, कोणी शेतींत असा, सारे भारताचे,

 भारतासाठीं श्रमणारे. आणि धनिकांनो, पैसा चैनीच्या वस्तूंत न दवडता उत्पादनांत ओता. उधळपट्टी नको. अधिकाऱ्यांनो, तुम्हीहि गरिबीचा संसार करून बाकी पैसा राष्ट्राच्या बचतीसाठीं द्या. राष्ट्रभर एक लाट येऊं दे. मोठे अधिकारी, धनिकवर्ग, इंजिनियर, डॉक्टर, पांढरपेशे सारे अत्यंत काटकसरीनें राहायला शिकोत; वांचलेली पैनपै राष्ट्राच्या बचतीसाठीं देवोत. राष्ट्राला भांडवल हवें आहे. उत्पादक धंद्यांत घालायला हवें आहे.

पैसा पैसा मिळवून लोकमान्यांनीं कांच कारखाना काढायला प्रेरणा दिली. त्या लोकमान्यांच्या देशांत आम्ही का चैन करणार? निरुद्योगी राहणार? उपाशी मरणार? आपण आपलें कर्तव्य करूं. पुढील पिढी आणखी पुढें जाईल. लोकमान्यांच्या कर्मयोगाची संजीवनी राष्ट्राला तारील.

राष्ट्रपुरुषा, तुझ्या जीवनांत सर्वांना स्थान होतें. मुसलमानांच्या हातीं राज्य दिलेंत तरी चालेल; परंतु तुम्ही जा असें तुम्ही तीव्रतेनें म्हणायचे. आज देशाची दुर्दैवानें फाळणी झाली आहे. उपाय नव्हता. ते मुस्लीम–बहुसंख्य भाग आज ना उद्या अलग झालेच असते. कोटचवधि लोकांना केवळ दडपून ठेवता येणार नाहीं. तरी उरलेला ३० कोटींचा भाग कांहीं लहान नाहीं. येथें आम्ही सारे एकत्र नांदू, एक म्हणून वागूं, तर तुमच्या आत्म्याला किती आनंद होईल! भारताचा एवढा मोठा भाग लोकसत्तेखालीं कधीं होता? असें जनतेचें लोकशाही स्वराज्य कधीं होतें?

तुम्ही या स्वराज्याला, उर्वरित महान् भारताला आशीर्वाद द्याल. तुम्ही व्यवहारहि जाणणारे होता. जगाच्या इति-

हासाचा धडा हाच कीं आपण जसें इच्छितो, तसेंच सारे होत नसतें, मिळत नसतें. अनेक शक्तींचे अन्योन्य आघात प्रत्याघात होत असतात. क्रिया प्रतिक्रिया होत असतात.

तुम्ही म्हणाल, " सहा हजार मैलांवरचे तर गेले. पिळवणूक तर थांबली. ३० कोटि तरी आपल्या भाग्याचे विधाते झाले. ठीक. आता लागा कामाला. क्षुद्र भेद, भांडणें नकोत. झालें गेलें विसरून येथें नवसृष्टि निर्मायला उचला कुदळ फावडे. " होय, असेंच तुम्ही म्हणाला असता.

स्थितप्रज्ञा ! तुला संकटांची पर्वा नसे, कशाची भीति नसे. मुंबईस तुरुंगांत मित्र रात्रीं भेटायला आले तर तू घोरत होतास. उद्यां किती शिक्षा होईल याची मित्रांना चिंता परंतु तूं निश्चित होतास ! सुरतेला खुर्च्या, जोडे यांच्या वर्षावांत तूं धीरोदात्तपणें उभा होतास. तुझ्या डोळ्यांत सूर्याचें तेज, मुखावर सिंहाची सामर्थ्यशाली गंभीरता ! परंतु स्वराज्य मिळाल्यावर तुम्ही काय केले असते ?

समर्थ म्हणाले, 'आनंदवनभूवनीं स्वराज्य आलें,' 'उदंड जाहलें पाणी स्नान संध्या करावया,' 'आतां मला माझें भजन पूजन करूं दे.'

तुम्ही म्हणाला असतात, "आता मला गणितशास्त्रावर ग्रंथ लिहूं दे. वेदांचा अभ्यास करू दे."

ज्ञानोपासनेसारखा निर्मळ आनंद नाही. त्या आनंदांत का तूं रमला असतास ? अमेरिकेला स्वतंत्र करून जॉर्ज वॉशिग्टन शेतावर निघून गेला. परंतु जनतेनें त्याला बोलावून आणले नि म्हटलें तुम्हीच पहिले अध्यक्ष व्हा. तुम्ही सेवेंत पहिले,

 जनतेच्या हृदयांत पहिले." तसें भारतीय जनता तुम्हाला म्हणाली असती का ?

"मरायला तयार एक हजार तरूण द्या. मी बंड पुकारतो," "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे, तो मी मिळवणारच," "या न्यायासनाहून थोर असें एक ईश्वरी न्यायासन आहे. कीं तेथें मी निर्दोषच ठरेन. माझ्या हालअपेष्टांनी माझें कार्य वाढावें अशी ईश्वरी इच्छा असेल"– अशी एक का दोन शेकडो वचने आढळतात तुमची.

तुमच्या भव्य, दिव्य स्मृतिला शतशः प्रणाम, लोकमान्य प्रणाम !

✦ ✦ ✦

卐

## डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर

१४ एप्रिल म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा वाढदिवस. महाराष्ट्राचे, भारताचे ते भूषण आहेत. नवभारताची महान् घटना बनविणारे ते कायदे पंडित आहेत. हिंदूधर्माची नवस्मृति देणारे. स्त्रियांची मान उंच करणारे ते नवस्मृतिकार आहेत. ज्या समाजाला आम्ही आजवर दूर ठेवले त्याच्यातीलच एक महापुरुष नवधर्म देतो, ही गोष्ट हृदयास उचंबळ-

 विणारी आहे. हरिजनांनी जुने सर्व विसरावे. स्पृश्यांस क्षमा करावी. नविन उज्वल भविष्याकडे डोळे ठेवून पुढे जायला झटावे.

अति गरिबींत बाबासाहेब वाढले. किती अडचणी. कै. सयाजीराव महाराजांची मदत मिळाली. ते बॅरिस्टर होऊन आले. विद्यासंपन्न असूनही त्यांना दूर बसविले जाई. अपमान केला जाई. त्यांनी महाडचा सत्याग्रह, पुण्याचा सत्याग्रह, नाशिकचा सत्याग्रह, असे अनेक सत्याग्रह करून दलित समाज संघटीत केला. त्यांच्यात नवतेज निर्मिले. डॉ. बाबासाहेबांचे हे सर्वांत थोर कार्य. स्वाभिमानाची ज्योत पेटविणे, आत्मा जागृत करणे हे महत्वाचे कार्य असते.

मुंबईच्या लॉ कॉलेजचे ते प्रिन्सिपॉल होते. प्रांतिक विधिमंडळात होते. दिल्लीच्या घटनासमितीत आज ते धुरंधर आहेत. डॉ. बाबासाहेब हे ज्ञानाचे महान् उपासक. मागे पुण्याला एका सभेत ते म्हणाले, "न्या. रानडे, टिळक, गोखले अशी अभ्यासू माणसे, ज्ञानात रमणारी कोठे आहेत? महाराष्ट्राने ज्ञानाची प्रखर उपासना केली पाहिजे."

डॉ. बाबासाहेबांच्या घरी मोठे उंची फर्निचर दिसणार नाही. परंतु ग्रंथांनीं भरलेली कपाटे दिसतील. महर्षि सेनापती बापट "डॉ. बाबासाहेब खरे ब्राह्मण आहेत, ज्ञानाची उपासना करणारे आहेत" असे म्हणायचे.

बाबासाहेबांच्या जीवनावर भगवान गौतम बुद्धांचा अपार परिणाम झालेला आहे. त्यांनी मुंबईस जे महाविद्यालय स्थापिले त्याला बुद्धांचे "सिद्धार्थ" हे नाव दिले. बुद्धांनी आपल्या अहिंसाधर्माचा ज्या राजधानीत प्रथम उपदेश केला

त्या राजगृहाचे नाव त्यांनी आपल्या घराला दिले आहे. डॉ. बाबासाहेबांच्या अंतरंगांत बुद्धदेवांचे सिंहासन आहे. महाराष्ट्राला, नव भारताला वैभवाप्रत नेण्यास त्यांची शक्ति कारणीभूत झाली. प्रणाम या थोर भारतपुत्राला !

✦ ✦ ✦

卐

महात्मा ज्योतिबा फुले

१८९० च्या नोव्हेंबरच्या २७ तारखेला एक महान् तेजस्वी तारा भारतीय नभोमंडळांतून अस्तंगत झाला. एक दिव्य-तेज अंतर्धान पावलें.

परंतु तें अंतर्धान पावलें नाहीं. तें तेज अधिकाधिक दिव्य-भव्य होत गेलें.

म. ज्योतिबांनी दिलेला संदेश चिरंजीव आहे. जोंवर या

जगांत विषमता, अन्याय, दुष्ट रुढी आहेत तोंवर त्यांचा संदेश स्फूर्ति देत राहील.

मुलींची शाळा काढणारा, हरिजनांसाठीं हौद खुला करणारा, कॉंग्रेसच्या दारांत शेतकऱ्याचा पुतळा उभा करणारा, ड्यूक ऑफ विंडसर आले तर त्यांना शेतकरी पोषाखांत जाऊन भेटणारा, दगडधोंडे, शिव्याशाप, अपमान सारें विष शंकराप्रमाणें पचवून दरिद्री नारायणासाठीं उभा राहणारा असा हा धीरोदात्त पुरुष होता.

सत्यशोधक चळवळ त्यांनीं सुरु केली. धर्मातील आत्मा ओळखायला त्यांनीं सांगितलें. गुलामगिरीवर तेजस्वी पुस्तक लिहिलें. एक तेजस्वी जागृति त्यांनी निर्माण केली. ज्या काळांत त्यांनीं ही थोर कामगिरी केली, त्या काळाकडे पाहता ज्योतिबांच्या धीरोदात्ततेबद्दल आश्चर्य वाटते.

त्यांनीं रुढींवर कोरडे ओढले, स्वतःला श्रेष्ठ मानणाऱ्या जातींवर प्रहार केले. परंतु हें सारें समताधर्म यावा म्हणून. लोकमान्य नि आगरकर डोंगरीच्या तुरुंगांतून सुटले तर त्यांचें स्वागत करायला म. ज्योतिबा सर्वांच्या पुढे.

कै. शाहू छत्रपतींचीं एक गोष्ट. लोकमान्य आजारी असतांना छत्रपतींनी तार पाठविली, "माझा बंगला तुमच्यासाठीं आहे. प्रकृति स्वास्थ्यासाठीं यावें. प्रकृति सुधारो."

थोरांच्या हृदयांत बाह्य भेदांखाली एक अतूट अशी मानवता व दिलदारी असते. म. ज्योतिबांच्या पुण्यस्मृतीस शतशः प्रणाम! त्यांचा हा प्रिय महाराष्ट्र, प्रिय भारत थोर होवो व सत्याची उपासना करो.

✦ ✦ ✦

卐

## अमर नेताजी

केवढें भव्यदिव्य जीवन. लहानपणापासूनच ते बाणेदार. विद्यार्थी असतांना भारताचा अपमान करणाऱ्या गोऱ्या प्राध्यापकाच्या त्यांनीं तोंडांत मारली. ते विवेकानंदांचे भक्त. हिमालयांतहि निघून गेले होते. परंतु तेथें एका साधूनें त्यांना सांगितलें, " भारताची सेवा कर, गरिबांची सेवा कर, तेंच प्रभूचें दर्शन. "

ते हिमालयांतून भारतमातेच्या मुक्तीसाठीं आले. विलायतेंत गेले. परंतु परत आले तों असहकाराचा यज्ञ पेटलेला. 

महात्माजी राष्ट्राला त्याग-दीक्षा देत होते. देशबंधु चित्त-रंजन दास एका क्षणांत फकीर झाले. तसेच ते मोतीलाल. ते दिवस तेजाचे, पुण्याचे होते. सारें राष्ट्र उठलें, पेटलें. सुभाषबाबू देशबंधूंना मिळाले. आणि तेव्हापासून जीवनयज्ञ सुरू झाला. स्वयंसेवक संघटना बेकायदा झाल्या. हा तरुण तुरुंगांत गेला. हजारो गेले. पुढे सुटका. देशबंधु १९२५ मध्यें अकस्मात् मरण पावले. राष्ट्र हादरलें. सुभाषबाबू तरुणांची संघटना करूं लागले. ते महाराष्ट्रांत आले होते. जवाहरलाल, नेताजी व जयप्रकाश म्हणजे भारताचे तीन पृथ्वीमोलाचे हिरे.

१९२८ मध्यें कलकत्ता कॉंग्रेस झाली. सुभाषबाबू स्वयं-सेवकांचे मुख्य होते. १९३० साल उजाडलें. सत्याग्रह संग्राम सुरू झाला. सुभाषबाबू कितीदां तुरुंगांत गेले. त्यांची प्रकृती बिघडली. ते युरोपांत गेले. त्याच वेळीं विठ्ठलभाई पटेलहि युरोपांत आजारी होते. सुभाषचंद्रांनी त्यांची सेवा केली. १९३० मध्यें हरिपुरा कॉंग्रेसचे ते अध्यक्ष होते. परंतु त्यांचे व कॉंग्रेसचे मतभेद झाले. अध्यक्षहि चुरशीच्या निवडणुकीने ते झाले. गांधीजी म्हणाले, " माझा हा पराजय आहे. "

कोणते मदभेद होते ? जगांत महायुद्ध पेटणार दिसत होते. त्याबाबतींत सुभाषबाबूंची काही निश्चित योजना होती. त्यांचें धोरण कॉंग्रेस नेत्यांना पटलें नाही. पुढें त्यांना राजि-नामा द्यावा लागला. पंडितजींना अति दुःख झालें. " पृथ्वीने दुभंग होऊन मला पोटांत घ्यावे " म्हणाले.

 सुभाषबाबूंनीं पुरोगामी पक्ष काढला. देशभर संघटना केली. आणि १९३९ मध्यें महायुद्ध आले. सरकार सुभाषबाबूंवर सक्त पहारा करीत होते. ते आजारी आहेत. बातमी आली. आम्ही ४१ सालीं वैयक्तिक सत्याग्रहांत तुरुंगांत होतों. नेताजी निसटल्याची बातमी आली. पठाणी वेषात संकटांतून ते शेवटीं अफगाणिस्थानातून इटलीत व जर्मनींत गेले.

इकडे देशांत चलेजाव लढा पेटला. नेताजींनीं जर्मनीच्या ताब्यांतील हिंदी सैनिकांना आझाद सैनिक बनविलें. हिंदी लोकांची प्रतिष्ठा राखली. आणि पाणबुडींतून अटलांटिक व हिंदी महासागर ओलांडून धैर्यमूर्ति आली. ब्रह्मदेश जिंकित जपान आलेला. हजारों हिंदी सैनिक युद्धकैदी झालेले. नेताजींनीं आझाद सेनेची आधींच सुरू झालेली चळवळ व्यवस्थित केली. अंदमान-निकोबार 'शहिद' बेटें झाली. एकेक चमत्कार. 'अर्जी–ए–हुकुमते–हिंद' स्थापन झालें. नाणें पाडलें. खाती पाडलीं. अक्षराष्ट्रांनीं, स्वतंत्र हिंदी व्यापाऱ्यानीं कोटो कोटी खजिने दिले. गळयांतील हार लाखों रुपयांस जात. स्त्रियांच्या पलटणी उभ्या राहिल्या. कॅप्टन लक्ष्मी उभी राहिली. "महात्माजी, हे राष्ट्रतात, आशीर्वाद द्या," नेताजी म्हणाले, "चलो दिल्ली. भारतमाता हांक मारीत आहे. ते डोंगर, त्या नद्या बोलावीत आहेत. चला. पडलों तर भारताकडे जाणाऱ्या रस्त्याचें चुंबन घेऊन आनंदानें मरूं." दिव्य वाणी हिंदु–मुसलमान–शीख सारे एक. नव भारत जन्मले. हिंदी फौज निघाली. रंगून घेतलें गेलें. तिथल्या बहादूरशहाच्या कबरेस नेताजींनीं प्रमाण केला.

परंतु देशांतील चलेजाव लढाहि थांबला होता. आणि अॅटम बाँबनें जपान पडलें. आझाद हिंद फौज गवत खाऊन लढत होती. बैलगाडयांतून रणगाडयांशी झुंजत होती. परंतु आता उपाय नव्हता. नेताजींचे डोळे भरून आले, "तुम्हीं महात्माजींकडे जा. मी देशासाठीं जातों.

ते विमानांत चढले. परंतु त्या विमानानें त्यांना देवाघरीं नेलें. त्यांची शेवटची भेट, रिस्टवॉच, जवाहरलालकडे आली. ती त्यांनीं शरदबाबूंना दिली. आझाद सैनिक गिरफ्दार झाले. अनेकांना गोळ्या घालण्यांत आल्या.

परंतु कॉंग्रेसनें उंच आवाज केला. स्वर्गीय भुलाभाई उभे राहिले. "गुलाम राष्ट्राला बंडाचा अधिकार आहे" ते म्हणाले. पंडितजींनी जयहिंद मंत्र राष्ट्राचा केला. नेताजी हृदया–हृदयांत अमर झाले.

केवढें धगधगीत जीवन! ते एकदां म्हणाले, "माझ्या लग्नाचा विचार मला कधी शिवला नाहीं. भारतमातेचें स्वातंत्र्याशी लग्न कधीं लावीन हाच विचार मनांत असतो." त्यांच्या रोमरोमांत भारतीय स्वातंत्र्याची उत्कटता होती.

नेताजी, आम्ही धन्य, आम्ही तुम्हांस पाहिलें, तुमची वाणी ऐकली, शून्यातून विश्व निघण्याचें महान अद्वितीय कर्तृत्व पाहिले! भारतीय स्वातंत्र्य आणण्यांत तुमचा केवढा हिस्सा! प्रणाम, प्रणाम तुम्हाला! तुमचें जीवन आम्हांला जातीय विषापासून मुक्त करो, देशसेवेचे वेड लावो.

✦ ✦ ✦

卐

## महर्षि दादाभाई नौरोजी

चार सप्टेंबर हा दादाभाईंच्या जयन्तीचा दिवस.

'स्वराज्य' शब्दाचा मंत्र देणाऱ्या महर्षींचा दिवस. ९२ वर्षांचे ते महान् जीवन. १८२५ मध्यें मुंबईतील मांडवी भागात ते जन्मले. ११ व्या वर्षींच दादाभाईंचे लग्न झाले. पत्नी गुलाबाई सात वर्षांची.

दादाभाई अतिबुद्धिमान. इंग्रजी शाळा सुरू झालेली. तिच्यांत

गेले. आणि नुकत्याच सुरु झालेल्या कॉलेजांत सहा मुलें 
घ्यायचीं होतीं. बाळशास्त्री जांभेकर निवड करायला गेले. शिक्षकाने श्रीमंत मुलांना पुढे केले. दादाभाई गरीब. परंतु बाळशास्त्र्यांनी त्यालाही निवडले.

कॉलेजमध्ये उत्तम अभ्यास केला. ते खेळाडूहि होते. विटी-दांडू त्यांना फार आवडे. हिंदी क्रिकेट असे ते या खेळाला म्हणत. त्यांची स्मरणशक्ति अपूर्व. एकदां वाचले की म्हणून दाखवीत. गोष्टींचा ते कोष होते. गणित, विज्ञान, वाङमय यांत प्रवीण झाले आणि पहिले प्राध्यापक झाले.

त्यावेळचे न्यायमूर्ति म्हणाले, " मी निम्मे पैसे देतो. पारशी समाजाने निम्मे जमवावे. या बुद्धिवान तरुणाला बॅरिस्टर व्हायला जाऊ दे. " परंतु पारशी समाजाला मिशनऱ्यांची भीति वाटे. दोन पारशी तरुण ख्रिस्ती झाले होते. म्हणून प्रश्न तसाच राहिला.

स्टुडंट्स लिटररी अँड सायंटिफिक सोसायटी त्यांनी प्राणमय केली. तेथे निबंध वाचले जात, चर्चा होई. गुजराती ज्ञान-प्रकाश सुरु झाला. दादाभाई लिहीत. १८४९ मध्ये ऑगस्ट ४ ला स्त्रीशिक्षणाचा पाया घातला गेला. स्टू. लि. सा. सोसायटीच्या सभासदांनी मुली गोळा करायचे ठरविले. दादाभाई पारशी समाजात हिंडू लागले.

व्हरांड्यात मुली बसतील. तेथें आम्ही सकाळीं येऊन शिकवू असे हे मित्र म्हणत. ४४ पारशी मुली आल्या. २४ हिंदु मुली. श्री. जगन्नाथ शंकरशेट यांनी शाळेला सुंदर इमारत दिली. त्यावेळेस ' चाबूक ' मराठी पत्र निघे. त्याने स्त्री-शिक्षणावर खूप टीका केली. बायका नवऱ्यांना गुलाम

 करतील, त्यांना कोर्टात खेचतील वगैरे म्हटले. दादाभाईंनी पारशी मुलीना इंग्रजीही शिकवायला प्रारंभ केला.

पारशी–मुसलमान यांचा दंगा ५७ च्या आधी एकदा झाला. दादाभाईंनी त्या दंग्याच्या काळात रास्त गोफ्तार पत्र सुरु केले. ‘ खरे सांगणारा ’ असा या नावाचा अर्थ.

मित्रांच्या व्यापारी कंपनीत त्यांनी सामील व्हायचे ठरविले. १८५५ मध्यें ते २७ जूनला विलायतला जायला निघाले. प्रोफेसरी सोडून गेले. इंग्लंडमध्ये स्थापन झालेली पहिली हिन्दी फर्म. लंडनमध्ये गुजरातीचे प्राध्यापक झाले. लंडन कॉलेजच्या सीनेटवरही होते. मध्यंतरी ५७ चा इतिहास घडला. पुढे अमेरिकेतील युद्ध आले. कंपनीचे दिवाळे निघाले. दादाभाईंनी बहुतेकांचे देणें दिले. अपूर्व गोष्ट असे तिकडील लोकांस वाटले.

त्यांची पत्नी अशिक्षित. त्यांनीं शिकवायचा खूप प्रयत्न केला. अपयश आले. आई म्हणाली दुसरे लग्न कर. ते म्हणाले, “ तुझा मुलगा पत्नीस न आवडता तर तिला दुसरे लग्न कर सांगतीस का ? ” आई पुन्हा या बाबतीत बोलली नाही. लंडनमध्ये असता एका मित्राकडे जात. त्याला तीन मुली.

कोणी मुंबईस कळविले की दादाभाई एका इंग्रज मुलीशी लग्न लावणार आहेत ! आईचे पत्र आले, “ मी तुला दुसरी बायको कर म्हणत होते. आता असे करून कलंक लावणार ? ” दादाभाई तिकीट काढून लगेच मुंबईला आले. रात्री १२ वाजता घरी आले. टकटक केले. मायलेकरांची, पतीपत्नींची भेट झाली. संशय गेले. जाताना आई, पत्नीला

घेऊन गेले. परंतु पुढे धंदा बुडाल्यावर ते स्वदेशी परत आले. बडोद्यांत मल्हारराव गायकवाड यांची कारकीर्द. कारभारी, अधिकारी सारे भ्रष्ट. रेसिडेंटची मिजास. मल्हाररावांनी दादाभाईंना दिवाण व्हा विनविले. दिल्ली सरकारने चौकशी कमिटी नेमून मल्हाररावांच्या कारकीर्दीवर रिपोर्ट लिहविला. याला उत्तर द्या म्हणून कळविले. दादाभाईंनी "उत्तर काय लिहायचें ? मागील चर्चेत अर्थ नाही. पुढे कारभार सुरळीत राहण्याची हमी देतो," असे उत्तर द्यायला सांगितले. कमिशनचा रिपोर्ट खोटा म्हणते तर अंगलट येते. दादाभाईंनी निर्धारपूर्वक हेच उत्तर द्या म्हणून महाराजांस सांगितले. आणि प्रकरण निवळले.

दिवाणगिरी सोडून ते विलायतेत आले. प्रचार करू लागले. निबंध, लेख, भाषणें यांनी जागृति करू लागले. हिंदुस्थानचे उत्पन्न वर्षाला सरासरी फक्त २० रु. असे सिद्ध केले. पार्लमेंटमधील निवडणुकीला उभे राहिले.

लॉर्ड सॅलिसबरी म्हणाले, "या काळ्या आदमीला का निवडणार ?" परंतु काळा आदमी निवडून आला. इंग्लंडमध्ये ते हिंदची बाजू सारखी मांडीत. हिंदी लोक बुद्धिमान नाहीत, त्यांच्यात नीति नाही, असे कोणी लिहिताच ते त्यांचे दात त्यांच्या घशात घालीत.

कॉंग्रेसच्या स्थापनेच्या वेळेस ते होते. परंतु त्यांचे जीवन विलायती चळवळीत गेले. कलकत्त्यास मतभेद तीव्र होणार म्हणून त्यांना अध्यक्ष व्हावयास बोलाविले. ते आले. स्वराज्य शब्द त्यांनी उच्चारला. स्वदेशी, बहिष्कार शब्द जन्मले. दादाभाईंना पुण्याच्या कांबळी नावाच्या गृहस्थाने स्वदेशी

 छत्री दिली. ते म्हणाले, “या स्वदेशी छत्रीखाली राष्ट्र एकवटो.” ते पुन्हा विलायतेत गेले. परंतु १९०७ मध्यें परत आले. १९१६ मध्ये त्यांना विद्यापीठाने डॉक्टर पदवी दिली.

ॲनी बेझंट बाईंनी होमरूल चळवळ सुरु केली. ७० वर्षांची ती वृद्धा ९० वर्षांच्या दादाभाईंना म्हणाली, “तुम्ही अध्यक्ष व्हा लीगचे.” ते झाले. परंतु १९१७ मध्यें ऑगस्टच्या २० तारखेस ९२ वर्षांचे होऊन ते देवाघरी गेले. त्यांच्या पुण्य-पावन स्मृतीस भक्तिमय प्रणाम. भारताचे ते पितामह.

अनेक इंग्रजांनी साधुतुल्य पुरुष त्यांना म्हटले. महात्माजींचा त्यांच्याशी दक्षिण आफ्रिकेतून नेहमी पत्रव्यवहार. दादाभाई त्यांना स्वहस्ते पत्राचे उत्तर देत. थोर पुरुष. निःस्पृह, निर्भय ! चंदनाप्रमाणे ते झिजले.

‘जे हाती घ्याल ते तडीस न्या’ म्हणत. त्यांचा हा स्फूर्ति-दायी संदेश आपण पाळू या. “हिंदी पार्लमेंट कधी स्थापन होईल ?” असे ते म्हणायचे. आज तें स्थापन झाले आहे. ते भारताला भूषणभूत करणे म्हणजेच दादाभाईंचे अनृणी होणें होय.

✦ ✦ ✦

卐

मानवतेचा महाकवि
रविंद्रनाथ टागोर

गुरुदेवांचे स्मरण करू या. ७ ऑगस्ट १९४१ रोजी ते देवाघरी गेले.

१९१३ मध्ये त्यांच्या गीतांजलीला नोबेल मिळाले. या विश्वकवीनें जपान, अमेरिका इत्यादी देशात मग दौरा काढला. राष्ट्रवाद हा आक्रमक नसावा, जागतिक ऐक्याला तो अनुकूल असावा असा संदेश त्यांनी दिला.

रविन्द्रांचा राष्ट्रवाद संकुचित नव्हता. विश्वभारती स्थापून त्यांनी पूर्वपश्चिमेच्या ऐक्याचा, समन्वयाचा भारताला नि जगाला वस्तुपाठ दिला. वंगभंगाच्या चळवळीच्या वेळेस त्यांची काव्यवीणा भारतभक्तिची गीते गाऊ लागली. परंतु त्यांच्या देशभक्तीला अत्याचार, द्वेष सहन होत नसे.

देशाने स्वावलंबी होऊन आपला संसार नीटनेटका करावा, ते म्हणाले. असहकाराच्या चळवळीच्या वेळेस त्यांनी 'सर' पदवी परत केली. कलकत्ता काँग्रेसच्या वेळेस १९१७ त ते स्वागताध्यक्ष होते. परंतु राजकारण त्यांचा धर्म नव्हता.

ते एका मुलाखतीत म्हणाले, "माझ्या समोर मी तरुण असताना अनेक रस्ते होते. परंतु मी कवी आहे असे मला वाटले. तो माझा धर्म." पुण्याला एकदा व्याख्यानात ते म्हणाले "कोपऱ्यांत बसून गाणे माझा धर्म."

१९४१ मध्ये पंडितजी तुरुंगात. ब्रिटिश पार्लमेंटमधील एका बाईने दुष्ट टीका केली. रविंद्रनाथांनी मरणशय्येवरून तेजस्वी उत्तर दिले. ते म्हणाले, "भारताचा तो सुपुत्र तुरुंगात आहे. तो उत्तर देऊ शकत नाही. मी देतो." महात्मा गांधी आणि गुरुदेव यांचेंही परस्परांवर किती प्रेम !

रविन्द्रनाथ हे महाकवी होते. परंतु ते म्हणतात, "मी काव्य लिहीले. परंतु ते कशासाठी ? मानवता हा माझ्या काव्याचा आत्मा आहे." ध्येयहीन त्यांचे काव्य नव्हते.

त्यांची कला मानवतेच्या उपासनेसाठी होती. जवाहरलाल म्हणतात, "गुरुदेवांनी या राष्ट्राला क्षुद्रपणापासून वाचविले. जे जे पवित्र नि मंगल आहे त्याची जाणीव दिली." असे हे थोर पुरुष.

सत्य, सौन्दर्य आणि मांगल्य यांची आपल्या जीवनाने नि 
गीतांनी शिकवण देणारे. स्वतंत्र हिंदुस्थानला त्यांच्या शिकवणीची अत्यंत जरूर आहे. "सर्व धर्म नि मानववंश यांना एकत्र नांदवून भारत मानवतेचे तीर्थक्षेत्र करूं," ते म्हणत. स्वतंत्र भारताची नाव त्या ध्येयाकडे जात आहे.

"आमार यात्रा हइल सुरु
ओ गो कर्णधार
तोमारे करी नमस्कार."

– "आमची यात्रा सुरू झाली. प्रभु सुकाणू धरीत आहे. आम्ही वल्ही उचलली आहेत. जीवन–मरण म्हणजे ध्येयाकडे जायचा खेळ. तुफाने येवोत, वारे सुटोत. पर्वा नाही. आम्ही दुसऱ्यांच्या दारात भीक मागत जाणार नाही. आम्ही निराश होणार नाहीं. तो प्रभु नावेत आहे. आणखी काय हवे ?" असे या गीतात म्हणतात.

टीका झाली तरी "एकला चलोरे" ते सांगतात. "जेथे क्षुद्रता नाही, संकुचित रूढी नाहीत, जेथे सर्वांची मान सरळ आहे, जेथे बुद्धि अखंड पुढे जात आहे, जेथे नविन नविन उद्योगांना हात घातला जात आहे, ध्येये अधिकाधिक विशाल होत आहेत, अशा स्वातंत्र्याच्या स्वर्गांत माझा भारत जागृत होऊन नांदो," असे ते म्हणतात.

स्वातंत्र्य म्हणजे उत्तरोत्तर विशाल ध्येयाकडे जाण्याचे साधन असे गुरुदेव सांगत आहेत. तो संदेश स्मरून जाऊ या.

प्रणाम गुरुदेवांना !

✦ ✦ ✦

५

नवसंदेशाचा ऋषि
अरविंद घोष

श्री अरविंद घोष. महान पुण्यश्लोक नाम! बडोद्याची नोकरी सोडून कलकत्त्याला वंगभंगाच्या वेळेस १९०६ मध्ये राष्ट्रीय महाशाळेचे प्राचार्य म्हणून ते आले. पुढे वंदेमातरम् म्हणून पत्र काढले. ती तेजस्वी, अर्थपूर्ण वाणी वेड लावती झाली. त्यांचा भाऊ बारीन्द्र बाँब प्रकरणात. खुदीरामने बाँब टाकल्यावर माणिकटोळा कट उघडकीस आला. अरविंदांनाही गोवण्यात आले.

त्यांच्या बहिणीने, " माझ्या भावाला वाचवा तो निर्दोष 
आहे. वकील कोठून देऊ ? मी राष्ट्रासमोर भिक्षा मागते. " असे करुण पत्र प्रसिद्धले. शेवटी चित्तरंजनदास खटला चालवायला पुढे आले. त्यांनी खोटया पुराव्याच्या चिंध्या उडविल्या. न्यायाधीश अरविंदांचा विलायतेतील वर्गबंधु होता.

देशबंधु समारोप करताना म्हणाले, " राजकीय वादांची धूळ खाली बसेल. अरविंदांची कीर्ति सातासमुद्रापलिकडे जाईल. राष्ट्रीयतेचा महान कवी, देशभक्तीचा उद्‌गाता, नव संदेशाचा ऋषी म्हणून ते ओळखले जातील. "

अरविंद सुटले. तुरुंगात असताना त्यांना अंतर्बाह्य श्रीकृष्ण दिसे. ते पुढे पांदिचरीस गेले. गेली सदतीस वर्षें ते तेथे होतें. ते योगसाधना करीत आहेत. ते म्हणतात, " विश्वातील महान शक्ति दूर असते. इतर योगी त्या शक्तीकडे वर जातात. परंतु मी ती शक्ति खाली खेचून आणू बघत आहे. मानवी जीवनात मग क्रान्ति होईल. "

बेंजामिन फ्रँकलिनने आकाशातील वीज पृथ्वीवर आणली. अरविन्द ती दिव्य शक्ती, ती अध्यात्मिक शक्ति खाली आणून जीवनात नवे तेज आणू पाहात आहेत.

रविन्द्रनाथ म्हणाले, " पुष्कळ वर्षांपूर्वी अरविंदांना पाहिले नि म्हटले ' अरविन्द प्रणाम. ' आज पुन्हा भेटून तेच म्हणतो " अरविंद प्रणाम. " रविन्द्रनाथांची अरविंदांवर सुप्रसिद्ध कविता आहे.

मधून मधून हा महान साधक, हा योगीश्वर प्रचलित विषयांवर विचार सांगतो. गांधीजींच्या हत्येनंतर ते म्हणाले,

 "धीर धरा, ज्या शक्तीने भारताला आधार दिला तीच शक्ती पुढे प्रकाश देईल." भाषावार प्रांतरचनेलाही त्यांनी नुकताच पाठिंबा देऊन सांगितले, "विविधतेत एकता हा भारतीय संस्कृतिचा प्राण आहे. मध्यवर्ती सत्ता सर्वंकश करूनही प्रान्तीय विविधता नष्ट करू नका. राष्ट्राचा प्राणच त्याने नाहीसा होईल."

आज १५ ऑगस्ट हा अरविंदांचा जन्मदिवस. कलकत्त्यात आजपासून सात दिवस त्यांचा उत्सव आहे. जगातून मोठ-मोठी माणसे येणार आहेत. प्रणाम अरविंदांना, मानवी जीवनात नवप्रकाश आणू पहाणाऱ्या थोर योगीश्वराला.

रवीन्द्र, अरविंद, महात्माजी! तीन भव्य दिव्य नावे! एका इटालियन कवीने म्हटले, "प्रभु कधी कवीच्या, योग्याच्या, भिकाऱ्याच्या रूपाने अवतरतो." रविन्द्र, अरविंद आणि हरिजनके वास्ते हात पुढे करून महात्माजी—या तिघांच्या रूपाने भारतका प्रभू वावरत होता, वावरत आहे!

✦ ✦ ✦

卐

## राजाजी शतायु होवोत

८ डिसेंबरला राजाजींचा वाढदिवस होता. आज हिंदुस्थानचे ते गव्हर्नर जनरल आहेत. महात्माजींनीं हिंदुस्थानच्या राजकारणांत नवयुग आणलें. जसे पंडित मोतीलाल, दे. दास त्यांना मिळाले, त्याचप्रमाणें राजाजी. परंतु देशबंधु व मोतीलाल यांनीं पुढें स्वराज्य पक्ष काढला तसें राजाजींनीं केले नाहीं. गांधीजी त्या वेळेस तुरुंगात होते. राजाजी

विधायक कार्यावर भर देत राहिले. गांधीजींचा शब्द त्यांना प्रमाण वाटे. खादीच्या कार्यात त्यांनीं चैतन्य ओतलें. त्यांनीं आश्रम काढला. संघटनेचें जाळें विणलें. १९३४ नंतर कायदे-मंडळाचें युग येऊं लागले. ३४ च्या मुंबईच्या काँग्रेसमध्यें महात्माजी अधिकृतपणें काँग्रेसपासून दूर झालें. त्यावेळीं राजाजी म्हणाले, " महात्माजींचा काँग्रेसमधील प्रवेश जेवढा भव्य, तितकेंच त्यांचे आज दूर होणेंहि भव्य आहे. " प्रथम मंत्रिमंडळें आली. राजाजी मुख्य मंत्री झाले. ते लेपेचेपे नव्हते. एकदां काँग्रेसच्या आमदारांना जमवून म्हणाले, " मी असें कर्जबिल आणणार आहे. तुम्हांला संमत नसेल तर हा माझा राजीनामा घ्या " असें निर्भयपणें आमदारांना सांगणारे ते होते.

मद्रासभर त्यांनी हिंदीप्रचारास कायद्यानें जोर दिला. शाळांतून हिंदी ठेवण्यांत आली. त्यांना विरोध झाला. त्यांनी जुमानला नाहीं. दारूबंदीसही केवढी चालना त्यांनीं दिली ! स्वतः प्रचारार्थ जात. गावोगांवच्या मायबहिणी त्यांना ओवाळीत. कारण दारूबंदी झाली तर मायबहिणींचे संसार सुखाचे होणार होते.

राजाजी सुंदर सोपें बोलतात. ते वादविवादपटु आहेत. प्रतिपक्षाची उपहासगर्भ टिंगल करतात. त्रिपुरी काँग्रेसच्या वेळेस प्रदर्शन मंडपांतील भाषणांत म्हणाले, " गांधीजींचें नेतृत्व तुम्हाला तारील. ही नौका सुरक्षित नेईल. भोंकें पडलेल्या दुसऱ्या नौकांत नका बसूं. फसाल. "

मद्रासकडील निवडणुकीच्या दौऱ्यांत ते नेहमीं हनुमानाचा आदर्श ठेवा म्हणायचे. निवडणुकीच्या फलकांवर हनुमानाचें

चित्र असायचें. हनुमान म्हणजे निर्धार नि निष्ठा. रामाला हनुमान तसे तुम्ही महात्माजीना व्हा, कॉंग्रेसला व्हा असें ते सांगत.

परंतु महात्माजींचे एकनिष्ठ अनुयायी असले तरी आंधळे भक्त नव्हते. चलेजावचा लढा त्यांना पसंत नव्हता, ते त्या लढ्यात सामील झाले नाहींत. जिनांजवळ तडजोड व्हावी म्हणून खटपट करीतच होते. कांहीं तरी करून शांततेनें देशाचा प्रश्न सुटावा असें त्यांना वाटे. त्यांची टिंगल झाली. मुंबईंत त्यांच्यावर डांबर उडवण्यांत आलें. सिमल्याला जोडे फेकण्यांत आले. परंतु अशानें भिणारे ते नव्हते. सर्वांचा विरोध सहन करून ते स्वतःचीं मतें प्रतिपादित राहिले.

त्यावेळेस महात्माजींचा येरवड्यास हरिजनांसाठीं उपवास सुरू होता. मसुदा तयार होईना. राजाजी एकदां सरदारांना म्हणाले, "तुम्ही तरी गांधीजींना उपवास सोडायला सांगा." सरदार म्हणाले, "त्यांच्याहून अधिक पवित्र नि विशुद्ध आत्मा मी पाहिला नाहीं. मी त्यांना काय सांगणार ?"

राजाजी अति साधे आहेत. मद्रासचे गव्हर्नर होते. तरी स्वतः हातानें धोतर धुवायचे ! आजहि धूत असतील. तोच वेष, तीच राहणी–तुरुंगांत एका बादलीभर पाण्यांत सारें आटपायचे. ते पहांटे ५ ला उठत.

उठतात, प्रार्थना म्हणतात. गीता, उपनिषदें यांचे भक्त. तुरुंगांत गीतेवर प्रवचनें द्यावयाचे. त्यांनी तामीळ भाषेंत गोष्टी लिहिल्या आहेत. हिंदींत त्यांचा अनुवाद झाला आहे. साधे सुंदर लिहिणें. जेलमध्यें स्वतःचे फाटके कपडे शिवायचे. इतर राजबंदीहि त्यांच्याजवळ स्वतःचे फाटलेले कपडे

 आणायचे आणि राजाजी शांतपणें शिवायचे.

त्यांना अभिमान नाहीं. सेवाग्रामला गेले तेव्हां म्हणाले, "मी गव्हर्नर जनरल आहे, याचा अर्थ काय? याचा अर्थ इतकाचकीं कोणाहि हिंदी माणसाला आता ग. जनरल करू शकाल. माझ्यासमोर ही मुलें आहेत. यांच्यातीलहि कोणी उद्यां होईल." गव्हर्नर जनरल असोत किंवा कोठें आश्रमांत असोत. त्यांचें जीवन एकरूपच आहे.

मागें मद्रासला गेले तेव्हां म्हणाले, "आपल्या प्रांतांतला हिंदुस्थानांतील सर्वश्रेष्ठ अधिकारी बनला या दृष्टीनें माझ्याकडे नका बघूं. एका मद्राश्याला मान मिळाला ही दृष्टी नको."

ते आज परिपक्व झाले आहेत. 'गोष्टी सांगेन युक्तिच्या चार' हे आतां त्यांचें काम. त्यांच्याजवळ द्वेषमत्सर जणूं उरले नाहींत असें वाटतें. गोड मुरांबा व्हावा तसे ते झाले आहेत. जपून चला असें सर्वांना सांगतात. देशाला मोठे करा सांगतात. "स्वातंत्र्य आले आहे त्याची जाणीवहि तुम्हांला नाही. तुम्ही मुक्त आहांत. स्वातंत्र्याचे फळ मिळाले आहे. वायां नका दवडूं. संयमी बनाल तर स्वर्ग निर्माण कराल" असें मागें थोर कवि सुब्रह्मण्यम् भारती यांच्या स्मारकाच्या उद्‌घाटन प्रसंगी ते म्हणाले. सेवाग्रामला म्हणाले, "मृताची इच्छा राहिली तर त्याच्या आत्म्यास शांती नसते. गांधीजींना व्यक्तिगत इच्छा नव्हती. या देशावर त्यांचें फार प्रेम. येथील प्रत्येक व्यक्ति उद्योगी निसच्छील होईपर्यंत महात्माजींच्या आत्म्याला कोठली शांति?" मागें एकदां म्हणालें, "महात्माजी ही देवानें भारताला

दिलेली थोर देणगी आहे. तुम्हां आम्हाला मोठ्या भाग्यानें मिळाली. परंतु त्या देणगीला आपण पात्र आहोत कीं नाहीं. हरि जाणे. "

राजाजींची मुलगी गांधीजींच्या देवदासांना दिलेली. ते गांधीजींचे आप्त झाले, परंतु हृदयानें आधीच एकरूप झालेले होते. भारतीय तरुणांनी अशा या थोर सेवकापासून अपार काम करण्याची, आपल्या बुद्धीस पटेल त्याला निर्भयपणें चिकटून राहण्याची, साधेपणानें जगण्याची स्फूर्ति घ्यावी. राजाजी भारताची वाढती प्रभा बघायला भरपूर जगोत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचें अभिनंदन, त्यांना प्रणाम.

✦ ✦ ✦

卐

## सेवामूर्ति राजेन्द्रबाबू

ज्या बिहारमध्यें भगवान् बुद्धांनीं राजगृह येथें प्रथम त्या कोंकराला बळी देण्याऐवजी मला द्या म्हणून प्रेममयी वाणी राजाच्या यज्ञांत उच्चारली आणि मानवाच्या इतिहासांत एक अमर नवीन पान लिहिले, त्या बिहारांतच राजेंद्र-बाबूंचा पुण्य जन्म झाला. तिथीप्रमाणें मार्गशीर्ष पौर्णिमा, दत्तजयंती हा त्यांचा वाढदिवस. इंग्रजी तारीख ३ डिसेंबर.

राजेंद्रबाबूंना ६४ पुरीं होऊन पासष्टावें लागलें. महान् सेवकांचे महान जीवन. अतिबुद्धिवान. बहुतेक सर्व परीक्षांत ते पहिले आले. त्यांच्या परीक्षेच्या वेळेस नेहमी अडचणी यायच्या. कधीं नांवच नसावें. कधीं घोंटाळा व्हावा. आणि शेवटीं व्यवस्थित होऊन पहिले यायचे.

शिक्षण संपल्यावर कांहीं दिवस प्राध्यापकी केली. नंतर वकिली. परंतु चंपारण्यांत महात्माजी आले. राजद्रबाबूंच्या जीवनांत पुनर्जन्म झाला.

राजेंद्रबाबूंनीं त्या वेळेस वडील बंधूंना पत्रांत लिहिलें, "मी २० दिवस सारखा विचार करीत आहे. मी माझें नशीब देशाच्या भवितव्याशी जोडलें तर किती छान होईल! माझ्यावर तुम्हां सर्वांच्या आशा. तुमच्या हृदयाला धक्का बसेल. परंतु माझ्या हृदयांत एक महान् ध्येय मला पुकारीत आहे. तीस कोटींच्यासाठीं मला जाऊं दे. मला साधेपणानें राहण्याची संवय आहे. जड नाही जाणार. मी मनांत आणीन तर पैसे मिळवीन. परंतु मनांत ती महत्वाकांक्षा नसून देशसेवेची एकच इच्छा आतां आहे."

अशा रीतीनें हा थोर पुरुष तीस वर्षें सारखी सेवेची गंगा ओतीत आहे. बिहारमध्ये खादीची संघटना त्यांनी केली. बिहारमध्यें भूकंप झाला तेव्हां सरकारनें त्यांना सोडलें. तुरुंगांत ते आजारी होते. परंतु लोकांची दैना पाहून त्यांचे आजारीपण पळालें. त्यांनीं जनतेजवळ मदत मागितली. सरकार व जनता यांच्यांत अधिक मदत कोण करते याची चढाओढ लागली. राजेंद्रबाबूंनी पत्रक काढून जनतेला म्हटले "पैसे आतां पुरे. अधिक लागले तर सांगेन."

४२ च्या आंदोलनांत बिहारमध्येंच सरकारनें अति जुलूम केला. किती ठिकाणी गोळीबार. सुटल्यावर राजेंद्रबाबूंनी सर्व प्रान्ताचा दौरा आरंभिला. गोळीबारांत अपंग झालेले लोक भेटत. त्यांची ते व्यवस्था लावीत. चार जिल्हे अजून हिंडायचे होते. अंगांत ताप होता तरी जातच होते. एके दिवशी १०० ताप होता. मग कार्यक्रम थांबवला.

४२ च्या आंदोलनांत तुरुंगांत एकाच्या अंगावर फाटके कपडे होते. मित्राला म्हणाले "त्याला कपडे मागवून द्या." सर्वांची त्यांना काळजी. लहान लहान कार्यकर्त्यांची नांवें लक्षांत. एकदा मोतीहारीला सभा होती. "अरे, बत्तख मियांहि आले आहेत. ते बघा" शेजाऱ्याला म्हणाले. बत्तख मियांपर्यंत बात गेली. १७ सालीं चंपारण्यातील लढ्यात शेतकरी बत्तख मियां होता. राजेन्द्रबाबूंना १५।२० वर्षें झाली तरी त्याची ओळख नि स्मृति. बेतियाला गेले तर लगेच म्हणाले "चंद्रिकाबाबू बरे आहेत ना?" रांचीला गेले तर म्हणाले "कोहडा पांडे कोठे आहेत?"

सर्व सामान्य कार्यकर्त्यांची अशी स्मृति ठेवणें हे मनाच्या मोठेपणाचें लक्षण आहे.

एकदां एका जिल्ह्यांतील कांहीं कामावर एका मोठ्या कार्यकर्त्याचें नांव घालण्यांत येणार होतें. श्री. चक्रधर राजेंद्रबाबूंना म्हणाले, "हे गृहस्थ प्रसिद्ध असले तरी त्यांना संघटना जमणार नाही. या दुसऱ्या कार्यकर्त्यांचें नांव घाला." राजेंद्रबाबूंनीं तें ऐकलें.

३४ सालीं मुंबईच्या राष्ट्रीय सभेचे ते अध्यक्ष होते. अधिवेशन संपलें. जातांना महात्माजींच्या चरणांची धूळि लावून

निघाले. महात्माजीं हंसले व शेजारच्या मुलाची टोपी वल्लभभाईंच्या डोक्यावर चढवून भारावलेलें वातावरण त्यांनी मोकळें केलें.

बिहारभूकंप असो, राष्ट्रसभेचें अध्यक्षपद कठीण प्रसंगीं घेणें असो जबाबदारी घ्यायला राजेंद्रबाबूंनाच उभे रहावें लागतें. घटनासमितीचेहि तेच अध्यक्ष केले गेले. त्यांच्यासारखा निर्भय, निर्मल, निरहंकारी परंतु खंबीर, श्रद्धावान सेवक कोण ?

ते महाराष्ट्राचें दौऱ्यावर आले होते. अंमळनेर तालुक्यांतील नांदेड गांवीं जायचें होतें. मोटारची कांहीं अडचण आली, सायंकाळ झालेली. आम्ही रस्त्याच्या कडेला झाडाखालीं खान्देशी धुळींत बसलों. मी पत्रांतील कांही कविता म्हटल्या. मला म्हणाले " छान आहेत. " ती वृक्षाखालची सायंकाळ मी विसणार नाही !

लहानाहून लहान नि महानाहून महान्, अजात शत्रु, ज्ञानी असून निगर्वी, अशा या पुण्यपुरुषाला माझ्यासारख्याचें आयुष्य थोडे थोडें मिळून ते शतायु होवोत.

✦ ✦ ✦

卐

## देशबंधु चित्तरंजनदास

६-८-१८७० ला चित्तरंजनांचा जन्म झाला.

खानदान व कर्णासमान उदार घराण्यांत. शिकले, बॅरिस्टर झाले. परंतु घरीं गरिबी. वडिलांनीं अनेकांना हजारों रुपये मदत म्हणून दिलेले पैसे परत कोणी देईना. वडिलांनी स्वतःला दिवाळखोर म्हणून जाहीर केले. आणि चित्तरंजनांनी आपलेंहि नांव दिवाळखोर म्हणून नोंदलें. पित्याची

अप्रतिष्ठा स्वत:वरहि घेतली. कोर्टांत काम मिळना. यातायात. आणि वंगभंग चळवळ आली. खुदिरामनें बाँब फेकला. एका मॅजिस्ट्रेटनें भरमसाट शिक्षा दिल्या. एका मुलाला फटक्याची शिक्षा देण्यांत आली. म्हणून या मॅजिस्ट्रेटवर खुदिराम चवताळून गेला, परंतु बाँब चुकून दुसऱ्यावरच पडला. पुढें कट सापडला. माणिकतोळा बाँब खटला सुरू झाला. अरविंद घोष, त्याचे भाऊ बारिंद्र, अनेक आरोपी. वकील नीट मिळेना. अरविंदांच्या बहिणीनें माझ्या भावाला वाचवा म्हणून पत्रक काढलें.

आणि चित्तरंजन धांवले. सहा महिने रात्रंदिवस काम करीत होते. "अरविंद वेदांती आहेत. वेदांत सांगतो, तुझा उद्धार करणारा तूंच. हे जसे व्यक्तीच्या जीवनांत तसेंच राष्ट्राच्याहि. राष्ट्राला स्वत:चा आत्मा हवा असेल तर राष्ट्रानें स्वत:च्या पायावर उभे राहिले पाहिजे. तुम्ही स्वतंत्र व्हा. गुलामाला कोठला विकास ? तुम्ही ईश्वराचे अंश. तें तेज प्रकट करा. स्वातंत्र्याच्या रुपानेंच तें प्रकट होईल. हें स्वातंत्र्य मिळवितांना कष्ट पडले तर भोगा. तुरुंगांत जा. दुर्बळपणा नको" अशी अरविंदांची शिकवण. चित्तरंजन म्हणाले, अरविंदांनीं दहशतवाद नाही शिकवला. त्यांनी सविनय कायदेभंग शिकवला. देशबंधूंनी या बचावाच्या भाषणांत 'पॅसिव्ह रेझिस्टन्स' हा शब्द वापरला आहे. आफ्रिकेंतील थोर सत्याग्रह अजून पुढें यायचा आहे.

बारिंद्र, उल्हास कर वगैरेंचेहि खटले देशबंधूंनी चालवले व त्यांच्या फांशीच्या सजा जन्मठेपेच्या केल्या. चित्तरन्जन पहिल्या प्रतीचे बॅरिस्टर झाले. प्रॅक्टीस शिगेला पोंचली.

वर्षाला तीन लाखांची प्रॅक्टीस. परन्तु कुबेराप्रमाणे मिळवून कर्णाप्रमाणें देत. त्यावेळेस ते सुटींत इंग्लंडला जात. काव्य-शास्त्रांत रमत. पत्नी वासत्तीदेवी. उभयतांचें एकमेकांवर फार प्रेम. वासन्तीदेवी म्हणायच्या, " चित्त, कोणत्या रंगाचें पातळ नेसूं ?" " अस्मानी नेस, " असा विनोद.

बॅरिस्टर होऊन आले तेव्हा दारिद्र्य, निराशा. त्यावेळेस वैष्णवगीतें रचलीं. परंतु त्यांचे सागरसंगीत हें भव्य खंड-काव्य आहे. आई मरतांना चित्तरंजन जवळ नव्हते म्हणून म्हणाली, " त्यांचें सागरसंगीत आणन द्या. त्यांत तो आहे. " आई म्हणायची, " जन्मोजन्मी चित्तरंजनची आई होण्याचें भाग्य मिळो. " चित्तरंजनांचें हृदय सागराप्रमाणेच उसळे, उचंबळे.

आणि लोकमान्य टिळक सुटून आले. महायुद्ध झाले. मॉंटेग्यू कमिशन आलें. साक्षींत एका प्रश्नाला उत्तर देतांना देशबंधु म्हणाले, " आम्ही स्वराज्यास नालायक असूं तर तुम्ही दीडशें वर्षें काय केलें ? तुमची नालायकी सिद्ध होते, आमची नव्हे. " ते तेजस्वी शब्द ऐकून बंगालचा गव्हर्नर उठून गेला. परंतु मॉंटेग्यू बोलत बसले.

नवीन सुधारणा येणार होत्या. परंतु आधीं रौलेट बिल आलें. आणि साबरमतीचा महान् सत्याग्रही उभा राहिला. हजारो वर्षांत न मारलेली आत्म्याची हांक आली. आणि देसबंधूंनी सत्याग्रह पत्रावर पहिली स्वाक्षरी केली. जालि-यनवाला बाग, असहकार सारें आलें. लोकमान्यांचें निधन, नागपूरला असहकाराला विरोध करायला म्हणून देशबंधु आले परंतु महात्माजींनीं त्यांनाच ठराव मांडायला लावला.

कोणी प्रश्न केला, " तुमची वकीली ? " चित्तरंजन म्हणाले, 
" मी बोलतो तसा वागतो. "

आणि महिन्याच्या ५० हजारांच्या प्राप्तीवर पाणी सोडून यज्ञमूर्ति उभी राहिली. घोंगडीवर निजूं लागले. पाठ दुखे. मित्र म्हणाला, " गादी देऊ ? " तर रागावून म्हणाले, " देशसेवकाला गादी शोभत नाही. " देशबंधु तुरुंगात. बार्डोलीचा लढा थांबला. गांधीजींना शिक्षा. पुढे देशबंधु सुटले. त्यांनी स्वराज्य पक्ष स्थापला. बंगालभर वणवण हिंडून निधि जमवला. देशभर दौरे. तिकडे चांदपूरच्या मजुरांवर अत्याचार तर तुफान पद्मानदींत नाव लोटून गेले. " वादळांत मेलो तरी चालेल परंतु गेले पाहिजे " म्हणाले. परंतु आजारी पडले.

मरतांना शांत. महात्माजी भेटायला गेले. गांधीजी म्हणाले, " देशबंधूंचा अंतरात्मा आता कळला. "

देशबंधु एकदा म्हणाले " स्वातंत्र्य मिळवता मिळवता मी मेलो तर या भूमींत मी पुन्हां काम करीन. माझ्या जीवनांतील सारी आशा, सारा उत्साह या ध्येयासाठीं आहे. त्या ध्येयाची पूर्णता होईपर्यंत मी पुनः पुन्हां येथें जन्मेन नि धडपडेन. "

भारतभूमीवर त्यांचें अपार प्रेम. ते म्हणतात, " बाल्यापासून प्रेम करीत आलो मी या भूमीवर. तरुणपणांत मी चुकलो असेन, पडलो असेन तरी मातृभूमीवर प्रेम करीतच होतो. आणि आज उतारवयांतहि ती मूर्ति मी हृदयांत ठेवली आहे. भारतमातेची ती मूर्ति आज अधिकच सत्यतेनें अंतरंगांत मला दिसत आहे. "

 दहशतवादी तरुणांच्या त्यागाचें ते कौतुक करीत. म्हणतात, "कोणत्याहि स्वरूपांतील राजकीय खून वा अत्याचार यांचा मी कट्टा विरोधक आहे. मला त्याची शिसारी आहे. या देशांतील राजकारणांत खून, अत्याचार शिरतील तर स्वराज्याचें सुंदर स्वप्न भंगेल."

दहशतवादी प्रवृत्तीला विरोध करून ते म्हणतात, "परंतु स्वातंत्र्यप्रेमांत मी त्यांना हार जाणार नाही. मी त्यांच्या-बरोबर आहे. माझे कष्ट, माझी धडपड, माझ्या रक्ताचा बिंदुर्नबिंदु मी स्वातंत्र्यार्थ देईन. या देशांतील प्रत्येकानें म्हटलेंच पाहिजे की माझ्या मातृभूमीवर माझें प्रेम आहे. असे म्हणणे गुन्हा असेल तर मी गुन्हेगार आहे. कर्तव्यचुकार होऊन असें न म्हणण्यापेक्षां मी फांशी जाणें पत्करीन." स्वराज्याची कल्पना मांडतांना ते म्हणाले, "वसाहतीचे स्वराज्य म्हणजे बंधन नव्हे. दास्य नव्हे. तुम्ही एकत्र रहा वा फुटून निघा. महायुद्धापूर्वी फुटून निघण्याची वृत्ति होती. परंतु एकत्र राहणें बरें, कॉमनवेल्थमध्यें राहणे बरे असे आता वाटत आहे."

भारताविषयींचो कल्पना साकार करतांना ते म्हणाले, "प्रांतांना जास्तीत जास्त स्वातंत्र्य असावें. त्या प्रांतानें आपल्या विशिष्ट संस्कृतीनुसार वाढावें हेंच योग्य. परंतु भारताच्या बंधनानें, भारताच्या सेवाभावाने एकत्र सारे सांधलेले, एक-जीव झालेले. असे हे हिंदी संघराज्य. जगांतील सर्व राष्ट्रांचें जें जागतिक संघराज्य होईल त्यांतील हिंदी संघराज्य हा भाग. जागतिक संघराज्य मानवतेच्या सेवा भावनेवर अवलं-बून आहे. ज्या मानाने सर्वांची सेवा नि सर्वांना स्वातंत्र्य

देऊं त्या मानानें जागतिक संघराज्य मानवांमध्यें ऐक्य नि शांति ठेवूं शकेल."



अशा रीतीनें प्रांतिक स्वायत्तता, भारतीय संघराज्य, जागतिक संघराज्य या कल्पनेपर्यंत ते भरारी मारीत. आशियाई राष्ट्रांची परिषद बोलवूं इच्छित होते. मरणाआधीं एका मित्राला म्हणाले, "मी रविंद्रांवर त्यांच्या विश्वप्रेमासाठीं टीका केली. भांडलो. परंतु ते थोर आहेत. त्यांना माझा प्रणाम सांगा. गीतांजलीच्या रविंद्रांना आशियाई राष्ट्रांचें संमेलन बोलवायला सांगा. त्यांच्याहून कोण अधिक पात्र ?"

अनेक देशभक्तांना, क्रांतिकारकांना, त्यांच्या कुटुंबांना पोसायचे. कलकत्त्याच्या तुरुंगांत घरून डबा आला कीं सर्वांस द्यायचे. तुरुंगांत असतां तिकडे बाहेर बारिसालच्या सभेंत वासंतीदेवी अध्यक्ष असता वंदेमातरम् म्हणायला बंदी. ऐकून सिंहा प्रमाणे फेऱ्या घालीत राहिले. हिनें सहन कसे केले म्हणत ! हा मनुष्य फसवील असे त्यांना वाटले तरी त्याला मदत देत व म्हणत "चक्षुर्लज्जा, तुझें केविलवाणे तोंड बघवत नाही."

सभा परिषद संपली की स्वयंसेवकांना स्वतः वाढायचे. महात्माजींना एकदा म्हणाले "हे तरुण ही माझी शक्ति." नेताजी सुभाष हे तरुणांमधील तळपते बालतरुण. देशबंधूनाच ते आपला राजकीय गुरु मानीत. देशबंधुचें जीवन म्हणजे .स्फूर्तिचा अनंत ठेवा. विश्रांतिहीन कर्तव्य, असीम त्याग !

१६-६-१९२५ मध्यें दार्जिलिंगला हिमालयाच्या धवल शिखरांच्या सान्निध्यांत हा महापुरुष अनंतांत विलीन झाला.

◆ ◆ ◆

卐

देशभक्तांचा मुकुटमणि
लाला लजपतराय

भारताच्या स्वातंत्र्ययुद्धांत ज्ञात–अज्ञात अशा लाखोंचे बलिदान आहे. परंतु गंगेचा साराच प्रवाह पुण्यवान् असला तरी हरद्वार, प्रयाग, काशी इत्यादी ठिकाणें जशी अधिक पवित्र वाटतात, किंवा हिमालयाचीं अनंत शिखरें भव्य वाटलीं तरी कांचनगंगा, धवलगिरी, गौरीशंकर, इत्यादी जशी भव्यतम वाटतात, त्याप्रमाणे लोकमान्य, लालाजी, देशबंधु,

महात्माजी इत्यादी पुण्यश्लोक नांवे आहेत. १९०७–८ च्या काळांत लाल, बाल आणि पाल हीं तीन नांवें भारतभर दुमदुमत होतीं. 

लालाजी शिकले, वकील झाले. त्यांनीं पैसा मिळविला. स्वामी दयानंदांच्या शिकवणीचा त्यांच्यावर परिणाम झाला. ते शैक्षणिक चळवळींत पडले. लाहोरची दयानंद शिक्षण-संस्था म्हणजे लालाजींच्या श्रमांचें फळ. त्यांनी आधीं जवळचे ५० हजार रुपये टेबलावर ठेवले व मग लोकांजवळ मदत मागितली.

परंतु शिक्षणांत पडलेले लोकमान्य राजकारणांत आले. लालाजी कसे दूर राहतील ? ते वंगभंगाचे दिवस. लालाजींनी सारा पंजाब जागा केला. पंजाबांत ' भारत चळवळ ' सुरु झाली. ' पगडी सांभाळो ' हें घोषवाक्य होतें. एका सभेंत एक शीख तरुण लालाजींच्या भाषणानें संस्फूर्त झाला म्हणाला, " १। लाख शीख तुमच्या आज्ञेप्रमाणे वागायला तयार आहेत. " गुप्त पोलिसांचा अहवाल गेला कीं १। लाख सैन्य उभें करून लालाजी बंड करणार ! त्यांना मंदालेस स्थानबद्ध करून ठेवण्यांत आले. लालाजींना न सोडतील तर पार्लमेंट उडवावें, मोर्लेसाहेबांवर बॉंब टाकावा असे सेनापति बापट त्यावेळेस विलायतेंतील क्रांतिकारकांना म्हणालें.

लालाजी सुटले. परन्तु पुढे लोकमान्य टिळकांना शिक्षा झाली. लालाजी अछूत उद्धाराच्या कामाला लागणार होते. परन्तु ते परदेशांत गेले. आणि महायुद्ध सुरु झाल्यामुळें अमेरिकेंतच ते अडकले. तिकडे त्यांनी शेंकडों लेख व भाषणें यांनी अमेरिकेला भारताची परिस्थिति निवेदिली. डॉ. हर्डीकर

 त्यांचे चिटणीस होते. लोकमान्यांनीं सुटल्यावर लालाजींना कार्य चालवायला मदत केली.

पुढ लालाजी परत आले. तों जालियनवाला बाग होऊन गेली होती. कलकत्त्यांत त्यांच्या अध्यक्षतेखालीं राष्ट्रसभेचें जादा अधिवेशन भरून असहकाराचा ठराव मंजूर झाला. मतभेद असूनहि लालाजी गांधीजींच्या बरोबर उभे राहिले. ते दिल्लीच्या विधिमंडळांत गेले. शारदा बिलाच्या वेळेस अत्यंत आजारी असतांनाहि मत द्यायला गेले. सायमन कमिशनच्या बहिष्काराच्या मिरवणुकींत पुढे होते. त्यांच्या छातीवर लाठ्या बसल्या. ते म्हणाले " प्रत्येक लाठी म्हणजे ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या शवपेटिकेंत ठोकलेला खिळा आहे. " छातीला सूज आली व हा देशभक्तांचा मुकुटमणि १७–११–१९२८ रोजीं देवाघरीं गेला.

आणि पुढें बरोबर एक वर्षानें लालाजींवर लाठीचा प्रहार करणाऱ्या गोऱ्या सोजिरांचा अधिकारी सॉंडर्सचा खून झाला. भगतसिंग, राजगुरु, सुकदेव फांशी गेले. लालाजींचें भगतसिंगांवर फार प्रेम. भगतसिंगाला हवें तें पुस्तक ते मागवून देत. लालाजी केवळ चळवळे नव्हते. त्यांनी ' लोकसेवक संस्था ' ( Servants of the people ) स्थापिली. ' पीपल ' हें इंग्रजी साप्ताहिक व ' वंदेमातरम् ' हें उर्दू पत्र ते चालवीत. दुष्काळ, भूकंप, कोठेहि आपत्ति असो लालाजी पुढे असायचेच. त्यांनी उर्दूत अनेक पुस्तकें लिहिली आहेत. इंग्रजींतही त्यांनी ग्रंथ लिहिले आहेत. ' मदर इंडिया ' या भारताची नालस्ती करणाऱ्या अमेरिकन पुस्तकाला ' अनहॅपी ' या नावाचा ग्रंथ लिहून त्यांनी उत्तर दिलें. १९१९ च्या त्यांनीं अमेरिकेंत

सुरू केलेल्या यंग इंडिया मासिकाच्या सप्टेंबरच्या अंकांत क्रांती संबंधी विचार हा लेख "क्रांतीचा विद्यार्थी" या नावाने लिहिला होता. त्यांत ते म्हणतात, "जें राष्ट्र आपल्या स्वातंत्र्यासाठीं लढायला तयार नाही, तें त्याला पात्र नाही. बाह्य मदतीनें मिळविलेलें स्वातंत्र्य पटकन् जायचाहि संभव असतो. क्रांति यशस्वी व्हायला तिचा पाया नैतिक व मानवी हवा. लोकांचा पाठिंबा हवा. लोकशाहीसाठीं म्हणून ती क्रांति हवी. क्रांतिकारक संस्थांत गुप्तता येणें अपरिहार्य असेल तर नैतिकदृष्टचा हितकर ठरेल."
लालाजी, तुमच्या पुण्यस्मृतीस प्रणाम !

✦ ✦ ✦

卐

## हुतात्मा जतीनदास

१३ सप्टेंबर १९२९. आठवतो तो तुम्हाला दिवस? तो कसा विसरूं शकाल? तो रक्ताचा नि अश्रूंचा दिवस. महान् बलिदानाचा तो दिवस. त्या दिवशीं दुपारीं १ वाजता जतीनदास ६१ दिवसांचा उपवास करून देवाघरीं गेला.

भगतसिंग क्रांति–कामासाठीं तरुण मिळवायला कलकत्त्यास आले होते. त्यांना बटुकेश्वर दत्त आणि जतीनदास मिळाले.

१९२८ मध्ये कलकत्त्यास कॉंग्रेस भरली होती. जतीनदास स्वयंसेवकांच्या तुकडीवर अधिकारी होता. सुभाषबाबूंचा तो उजवा हात होता. पुढें लाहोरच्या कटाच्या धरपकडींत त्यालाहि अटक झाली. राजकीय कैद्यांना नीट वागवण्यांत यावें म्हणून अन्नसत्याग्रह सुरू झाला. त्यावेळेस भगतसिंग दूरच्या एका तुरुंगांत होते. जतीनदास प्रथम सामुदायिक अन्नसत्याग्रहाच्या विरुद्ध होते. कारण बळजवरीनें अन्न घालण्यांत येतें. सत्याग्रहाची विटंबना होते. परंतु जतीनदासहि उपवास करू लागले; ते एनिमाहि घेत ना. शेवटीं भगतसिंगांना लाहोर जेलमध्यें आणण्यांत आले. त्यांनीं जतीनदासांना एनिमा घ्या सांगितलें. कोणाचें न ऐकणाऱ्या जतीनदासांनी ऐकलें.

अधिकाऱ्यांनी विचारलें "इतरांचें ऐकलेंत नाही. भगतसिंगांचेंच कां ऐकलेंत?" जतीनदास म्हणाले "भगतसिंगांची योग्यता केवढी आहे ते तुम्हाला माहीत नाही. त्यांचा शब्द कसा मोडूं?"

पुढे भगतसिंगांनी जतीनदास सुटावेत म्हणून राजकीय कैद्यांच्या चौकशी समितीला सांगितलें. परंतु कोणतीहि अट मान्य करून तें सुटायला तयार नव्हते. सुभाषबाबूंनीं त्यांच्या तसें करण्यास संमति कळविली होती. भाऊ व वडील अट पत्करून सुटणें नको म्हणाले.

जतीनदासनें सक्तीचें अन्न नाकारलें. सात आठ जण छातीवर बसले. डॉक्टरने नळी नाकांत घातली. जतीनदास खोकला. दूध फुफ्फुसांत गेलें. फुफ्फुसें बिघडलीं. डॉक्टरांना पुन्हां सक्तीनें घशांत दूध वगैरे दवडणें अशक्य झालें. दिवसेंदिवस

जतीन अशक्त झाला. तिळतिळ तो मरत होता. हात हलवेना. पापणी हलवेना.

सरकारनें बाहेर दवाखान्यांत नेऊन कोणाचा तरी खोटा जामीन घेऊन त्याला सोडण्याचें ठरविलें. ते पहा अधिकारी स्ट्रेचर घेऊन आले.

जतीनदासाच्या खोलींतील क्रांतिकारी म्हणाले, "आमच्या मुडद्यावरून त्यांना न्यावे लागेल."

जतीनदासानें खूण करून अधिकाऱ्यांना सांगितलें, "मी विरोध करीन."

या झटापटींतच हृदय थांबेल अशी भीति अधिकाऱ्यांस वाटली. ते गेले. आणि मित्र जतीनदासाच्या मरणशय्ये-भोवतीं बसले. त्यानें सर्वांचे हात सर्वशक्ति एकवटून हातांत घेतले.

अधिकाऱ्यांनीं सर्व क्रांतिकारकांना कमऱ्यांत नेलें. शूर जतीन आतां तेथें एकटा होता.

भारतमातेचा त्यागी सुपुत्र! दुसऱ्यांना नीट जगता यावे म्हणून मरणारा! राजकीय कैद्यांचे हाल बंद व्हावेत म्हणून अग्निदिव्य करणारा जतीन!

१३ सप्टेंबर १९२९! दुपारची एक वाजायची वेळ आणि हा हुतात्मा देवाघरीं गेला.

त्याची स्मृति अखंड स्फूर्ति देत राहील.

✦ ✦ ✦

卐

क्रांतिवीर
सरदार भगतसिंग

सरदार भगतसिंगांचा जन्म १९०७ च्या ऑक्टोबरमध्यें झाला.

ज्या दिवशीं ते जन्मले त्याच दिवशीं तुरुंगांत त्यांचे एक चुलते वयाच्या केवळ २८ व्या वर्षीं मरण पावले. सरदारांचे दुसरे चुलते अजितसिंह ह्यांना २० वर्षांची हद्दपारी होती. त्यांची हद्दपारी नेहरू सरकारने रद्द केली आणि ते माय-

 भूमीला परत आले. सरदारांच्या वडिलांचें नांव किसनसिंग. त्यांचे आजोबा अर्जुनसिंग व आजी जयकुंवर फार देशाभिमानी होतीं. भगतसिंगांचा खटला चालला होता तेव्हां ८० वर्षांचे वृद्ध आजोबा अभिमानानें खटला ऐकायला येऊन बसत. आजीनें एकदां सुफी अंबाप्रसाद या अज्ञात देशभक्ताला घरांत थारा दिला होता. पोलीस आले परंतु तिनें दाद दिली नाही. त्यावेळेस लाहोरला खालसा हायस्कूल होतें. परंतु ही शिक्षणसंस्था शीखांची असूनहि ती राजनिष्ठ म्हणून वडिलांनीं आपल्या मुलास दयानंद अँग्लोवैदिक हायस्कुलांतच घातलें. त्यांना देशावर प्रेम करणारा धर्म हवा होता.

परंतु असहकार आला. जालियानवाला बागेंत हत्याकांड झालें. पंजाबभर लष्करी कायद्याचा धिंगाणा होता. कॉंग्रेसनें बहिष्कार पुकारला. भगतसिंग शाळा सोडून बाहेर पडले. त्यावेळेस त्यांचें जेमतेम १४ वर्षांचें वय. लाहोरच्या नॅशनल कॉलेजांत ते दाखल झाले. तेथेंच सुखदेव, यशपाल, वगैरेंशीं मैत्री झाली. पहिल्या महायुद्धांत अनेक शीखांवर बंडाचे खटले झाले होते. त्यांच्या त्यागाच्या कथा भगतसिंग ऐके. 'बाबर अकाली' पक्ष पंजाबांत होता. त्यांच्याहि गोष्टी कानांवर येत. वडिलांनीं त्या क्रांतिकारकांना हजारो रुपयांची मदत केलेली. भगतसिंग लाहोर सोडून कानपूरला आले. तेथें हुतात्मा गणेश शंकर विद्यार्थी यांची नि त्यांची मैत्री जमली. १७–१८ वर्षांचें वय. परंतु क्रांतिकारक संघटना करण्याचें ठरलें. कारण महात्माजींचा सत्याग्रह थांबला होता. आणि त्यांना तुरुंगांतून सोडण्यांत आलें तेव्हां त्यांनी

विधायक कामाला वाहून घेतले. पंडित मोतीलाल नेहरू, देशबंधु दास यांनी स्वराज्य पक्ष काढला. देशाच्या अशा परिस्थितींत तरुणांनीं पुन्हां क्रांतिकारक संघटना आरंभिली. 'हिंदुस्थान रिपब्लिक असोसिएशन' स्थापण्यांत आली. शचिंद्रनाथ संन्याल, जोगेशचंद्र, पंडित रामप्रसाद बिस्मिल इत्यादी तरुण यांत होते. भगतसिंगहि सामील झाले. त्यांनी बलवंत नांव घेतलें. १९२६ मध्यें काकोरीला खजिना लुटला गेला. पुढें धरपकडी सुरू झाल्या. भगतसिंग लाहोरला गेलें. इकडे काकोरी कटांतील आरोपी लखनौच्या जिल्हा तुरुगांत प्रथम होते. त्यांना पळवून नेण्याचा एक धाडसी कट सरदार भगतसिंगांनी केला. परंतु जमलें नाहीं. काकोरी कटांतील वीर फांशी गेलें. अनेकांना दीर्घकालीन सजा. भगतसिंगांच्या मनावर या गोष्टींचा अपार परिणाम झाला. ते लाहोरला खूप अभ्यास करू लागले. लाला लजपतराय यांनी तेथें "सर्व्हंटस् ऑफ पीपल" नावाची संस्था सुरू केली होती. तेथें ग्रंथालय होतें. भगतसिंगांनी शेकडों पुस्तकें वाचलीं. आयर्लंड, इटली, रशिया इत्यादि देशांच्या स्वातंत्र्याचे, क्रांतीचे इतिहास वाचले. त्या ग्रंथालयाची जी नोंद–वही आहे ती बघितली तर इतकीं पुस्तकें वाचणारा त्या ग्रंथालयास कोणी मिळाला नव्हता असें दिसेल. नसलेलीं पुस्तकें ते मागवायला लावीत. लालाजीचें तर भगतसिंगवर पुत्रवत प्रेम जडलें.

१९२६ मध्यें लाहोरला रामलीलेची मिरवणुक होती. कोणी तरी बॉंब फेकला. पोलिसांनीं भगतसिंगांनाच अटक केली. ते म्हणाले, "मी बॉंब फेकला नाहीं. रामलीलेच्या मिरव-

 णुकीवर का मी बॉंब टाकीन ?" त्यांना ६० हजारांच्या जामीनावर मोकळें करण्यांत आलें. हायकोर्टानें पुढें जामीन रद्द केला.

आईवडिलांनी एका सुंदर मुलीजवळ लग्न ठरविलें. भगतसिंग म्हणाले, " माझा विवाह ध्येयाशीं लागलेला आहे. मातृभूमि दास्यमुक्त होईपर्यंत कोणत्याहि मोहांत न गुंतण्याचा मी निश्चय केला आहे. "

लाहोरांत त्यांनी नवजवान सभा काढली. तिच्या पंजाबभर शाखा. भगतसिंगांनीं पंजाबभर काकोरी दिन साजला केला. अनेक हुतात्म्यांचे नि क्रांतिकारकांचे फोटो मिळवून त्यांनीं स्लाईडस् तयार केल्या. लाहोरच्या ब्रॅडले हॉलमध्यें मॅजिक लॅंडर्ननें हें सारें दाखवण्यांत आलें. प्रत्येक क्रांतिकारकाचा परिचय भगतसिंगानीं लिहिला होता. अलोट गर्दी जमली होती. पंजाब सरकारनें या कार्यक्रमावर पुढें बंदी घातली.

काकोरी कटानंतर संघटना विस्कळित झाली होती. ती पुन्हा नीट उभारायची ठरलें. भगतसिंगांनीं अनेक ठिकाणीं तरुण मिळावे म्हणून दौरा काढला. काशी विद्यापीठांत तेव्हा शिवराम राजगुरु शिकत होते. ते त्यांना मिळाले. कलकत्त्याचे बटुकेश्वर दत्त मिळाले.

भगतसिंग वगैरे क्रांतिकारकांनी आपल्या संघटनेचें नांव बदललें. समाजवादी रचना व्हावी असे अभ्यासानें त्यांना वाटलें. " हिंदुस्थान सोशलिस्ट रिपब्लिक असोसिएशन " असें नांव घेतलें. आग्रा शहरांत त्यांनीं दोन घरें भाड्यानें घेतली होतीं तेथें तरूण राहत. कधीं डाळे चुरमुरेच खात. कडाक्याच्या थंडीत पांघरायला नसे. नेम मारायला शिकणें,

इतिहास, अर्थशास्त्र यांचा अभ्यास, डोंगर चढणें, दऱ्या उतरणें, पोहून जाणे, इत्यादी गोष्टी शिकत. अशा वेळेस लालाजींवर मार पडल्याची बातमी आली. भगतसिंग, सुकदेव, राजगुरु यांनी लाहोरला जायचें ठरविलें. चंद्रशेखर आझाद हेहि दूर उभे राहणार होते. पळून जायचें नाहीं, ज्योतीन मुकर्जीप्रमाणे पोलिसांशीं लढत देत मरायचें असें ठरले. 

१७–१२–१९२८. लालाजींना लाठ्या मारणारा सार्जंट सॉंडर्स फटफटीवरून जात होता. गोळ्या घालण्यांत आल्या. सॅंडर्स मरून पडला. चौघे रिव्हाल्वर घेऊन उभे होते. कोणी आलें नाही. ते निघून गेले. दुसऱ्या दिवशीं लाहोरभर भिंतीवर पत्रकें "लालाजींचा बदला घेतला – हिंदी सोशलिस्ट रिपब्लिकन असोशिएशन," अशीं लावली गेली.

चंद्रशेखर आझाद गोसाव्याच्या मेळाव्यांत गेले नि निसटले. भगतसिंगांनी गोऱ्या ऑफिसरचा पोषाख केला. ते गोरे गोरे होते. बरोबर सुकदेव हे पट्टा घातलेले शिपाई. आणि राजगुरु टिफिन कॅरियर घेऊन जाणारे बबर्जी झाले! नवी कोरी करकरीत ट्रंक बरोबर. ट्रंकेवर लाहोरांतीलच एका बड्या अधिकाऱ्याचें नांव आणि स्टेशनांत आले तिघे. ट्रंकेवरचें नांव पाहून पोलिसांनी मुजरा केला!

भगतसिंग वगैरे कलकत्त्याला गेले. १९२८ डिसेंबरमध्यें तेथें राष्ट्रसभेचें अधिवेशन होते. कांहीं बंगाली क्रांतिकारक काळ्यापाण्यावरून सुटून आले होते. भगतसिंग त्यांना भेटले परंतु कांहीं दिवस सशस्त्र क्रांतींत पडायचें नाहीं असें बंगाली क्रांतिकारकांनी ठरवलें होते. भगतसिंगांनी त्यांच्याजवळून

बाँबविद्या घेतली. अज्ञात लोकांना निवारा म्हणून कलकत्त्यास एक हॉटेल त्यांनी सुरू केलें आणि परतले. पंजाबांत व अन्यत्र त्यांनी बाँब तयार करणे सुरू केलें. या सुमारास दिल्लीच्या विधि–मंडळांत सरकारनें "पब्लिक सेफ्टी बिल व ट्रेड डिस्प्यूट्स अॅक्ट" हीं दोन बिलें आणलीं. असेंब्लित बाँब फेंकायचें ठरलें. कोणा माणसावर नाही टाकायचा, पळून जायचें नाहीं. हिंदुस्थान किती असंतुष्ट आहे हें बाँबच्या आवाजानें ब्रिटिशांच्या कानांत घुसवायचें. सभांनी तें नाही घुसत. तीन दिवस खिशांत रिव्हॉल्वर आणि बाँब घेऊन बटुकेश्वर आणि भगतसिंग असेंब्लीच्या गॅलरींत जात होते. भगतसिंग रुबाबांत जायचे. जणू मोठा साहेब वाटे. ८–४–१९२९ ला त्यांनीं बाँब टाकले. धूरच धूर. सभासद पळाले. कोणी संडासांत लपले. पंडित मोतीलाल नेहरू, मदन मोहन मालवीय, अध्यक्ष विठ्ठलभाई पटेल आणि सर जेम्स क्रेशर हे चौघे आपापल्या जागीं स्थिर होते. भगतसिंग, बटुकेश्वर तेथें उभे होते. भरलेले रिव्हाल्वर हातीं होते. परंतु त्यांनी कोणाला मारलें नाही. एखाद्याची हत्त्या हें त्यांचें ध्येयच नव्हते. नाहींतर तो बाँबही कोणावर त्यांनी टाकला असता. ते पोलिसांच्या स्वाधीन झाले. खटला सुरू झाला.

"इन्किलाब जिंदाबाद, कामगार वर्गाचा जय असो" अशा घोषणा कोर्टांत येतांना करीत. त्या नवीन घोषणा होत्या.

भगतसिंगांनी जी कैफियत दिली ती चिरंजीव आहे. क्रांतीचें शास्त्रीय तत्वज्ञान तिच्यांत त्यांनी मांडलें. ते म्हणतात "वाटेल त्याची कत्तल करणारे आम्ही भाडोत्री सैनिक नाही.

आम्ही इतिहासाचा सखोल अभ्यास केला आहे. आम्हाला येथील शासनपद्धतीचा बाँब टाकून सक्रीय विरोध करायचा होता. आम्हीं मानवी जीवन पवित्र मानतो. मानव्याच्या सेवेसाठीं आम्ही प्राण देऊ. परंतु राजकीय स्वातंत्र्यासाठीं निःस्वार्थी हिंसा ही हिंसा होत नाही. गॅरिबॉल्डी, शिवाजी-महाराज कां हिंसक ? व्यक्तीला मारण्यांत अर्थ नाही. परंतु संघटीत सशस्त्र क्रांति करण्याचा गुलाम राष्ट्राला हक्कच आहे.

"तुम्हीं आम्हाला शिक्षा करा. परंतु आम्ही कोण ? आम्हा दोन क्षुद्र घटकांचा नाश केल्यानें राष्ट्राचा नाश नाही होणार. बॅस्टिलीच्या तुरुंगांत क्रांतिकारक कोंडल्यानें फ्रेंच क्रांतिकुंड विझलें नाही. फांशी दिल्यानें क्रांति थांबत नाही. क्रांतीला कोण रोखूं शकेल ? आणि क्रांति म्हणजे हिंसा नव्हे. क्रांति म्हणजे समाजव्यवस्थेत बदल. आजची समाजरचना अन्याया-वर उभारलेली आहे. श्रमाचीं फळें पूंजिपति हिरावून नेतात. प्राथमिक हक्कहि आज श्रमणाऱ्यांना नाहींत. आम्हाला अशी समाजरजना हवी आहे जिचा पाया डळमळीत नसेल. शाश्वत पायावर म्हणजेच सत्याच्या नि न्यायाच्या पायावर समाजाची रचना आम्ही करू इच्छितो. हें आमचें ध्येय. क्रांतियज्ञाच्या वेदीवर आम्ही आपलें जीवन धूपाप्रमाणें ठेवीत आहोंतः जें ध्येय आमच्यासमोर आहे त्याच्यासाठीं केवढाहि त्याग केला तरीं अपुराच आहे."

हें निवेदन देशी व विदेशी १४ पत्रांतून एकदमच प्रसिद्ध झालें ! असें हें धीरोदात्त निवेदन सरदार भगतसिंगांनीं केलें. त्या दोघांना दहा दहा वर्षांची सक्त मजुरी देण्यांत

आली. एका दूरच्या ओसाड तुरुंगांत त्यांना ठेवण्यांत आलें. याच सुमारास सॉंडर्स कटाच्या बाबतींतहि काहीं धरपकड चालू होती. श्री. जतिंद्रनाथ वगैरेंना अटक करण्यांत आली होती. लाहोरच्या तुरुंगांत ते होते. राजकीय कैद्यांना निराळ्या रीतीने वागवावे म्हणून अन्नसत्याग्रह सुरु झाला. जतिंद्रनाथ एनिमाहि घेत ना. त्यांची स्थिति चिंताजनक झाली. मोठमोठ्या पुढाऱ्यांनीहि सांगितलें. परंतु व्यर्थ. “ भगतसिंगांनी सांगितलें तर ते ऐकतील, ” कोणी म्हणाले. सरदार भगतसिंगांना लाहोरला आणण्यांत आले. भगतसिंगानीं त्यांना एनिमा घ्यायला लावलें. सुपरिंटेंडेंट खानसाहेब खरीददीन जतींद्रनाथांना म्हणाले, “ तुम्ही थोरामोठ्यांचें ऐकलें नाही. याचेंच कां ? ” जतींद्र म्हणाला, “शूर भगतसिंगांची योग्यता केवढी आहे तें तुम्हांस माहीत नाही. अशा थोर पुरुषाच्या शब्दाचा अपमान करणें मला शक्य नाही. ” जतींद्रनाथांना मुक्त करा म्हणून भगतसिंगांनी राजकीय कैद्यांच्या चौकशी समितीला सांगितलें. परंतु सरकारनें नाकारलें. जतींद्र उपवास करून देवाघरीं गेला.

आणि सॉंडर्सच्या खुनाचा खटला सुरू झाला. भगतसिंग, राजगुरु, सुकदेव हे मुख्य आरोपीं सिद्ध झाले. हे क्रांतिकारक कोर्टांत जयघोष करीत, कोर्टांत प्रार्थना करीत, बाहेरच्यास संदेश पाठवीत. १९२९ डिसेंबरमध्यें कॉंग्रेस भरली लाहोरला. त्यावेळेस पंडित मोतीलाल नेहरू त्यांना भेटून आलें. ते म्हणाले, “ एका असामान्य व्यक्तीला भेटलो. त्यांची विचारसरणी ऐकून माझ्याहून हे किती श्रेष्ठ असे वाटलें. एका ‘ पुरुषा ’ची भेट झाली; म्हणून फार आनंद झाला. ”

इकडे मिठाचा सत्याग्रह सुरू होता. तिकडे हा खटला चालला होता. राजगुरुंची आई कोर्टांत यायची. प्रेमळ भगतसिंग धांवत जाऊन त्या मातेचे दोन्ही हात आपल्या हातांत प्रेमानें घेऊन म्हणत, " मा, रो मत ! राजगुरु जीता रहेगा, खाली भगतसिंग मर जायगा. " परंतु ७ ऑक्टोबर १९३० रोजी तिघांना फांशीची शिक्षा सुनावण्यांत आली.

फांशीच्या आधीं भगतसिंगांच्या आईला भेटहि देण्यांत आली नाही. फक्त राजगुरूंच्या आईला भेटायची परवानगी मिळाली. परंतु भगतसिंगांच्या आईस परवानगी नसेल तर मलाहि नको असें ती महाराष्ट्रीय माता म्हणाली !

महात्माजींनी असें फांशी देऊं नका लिहिलें. यंग इंडियांत त्यांनीं गौरवपर लेख लिहिला. " माझा मार्ग निराळा असला तरी भगतसिंगाचें शौर्य, निष्कलंक चारित्र्य, त्याग यावद्दल मला अपार आदर आहे. " परंतु सरकारनें ऐकले नाही. २३ मार्चला सायंकाळीं ७ वाजतां तिघांना वध-स्तंभाकडे नेलें. तिघांनी एकमेकांस शेवटचें भेटून घेतलें. भगतसिंग गोऱ्या मॅजिस्ट्रेटला म्हणाले, " अत्युच्च ध्येया-साठीं हिंदी क्रांतिकारक मृत्यूला आनंदानें कशी मिठी मारतात तें पाहण्याचें भाग्य तुम्हाला मिळालें, अच्छा ! " ७ वाजून ३३ मिनिटांनी त्यांच्या गळयाला फांस लागला. तिघे अमर झाले. शतशः प्रणाम !

भगतसिंग गोरे गोरे दिसत. ५ फूट १० इंच उंची. गोड आवाज. एकदां तुरुंगांत बॅ. असफअल्ली त्यांना भेटायला जात होते. तर बेड्यांच्या झणत्कारावर ते गाणे गात होते. ते एका पत्रांत लिहितात, " क्रांतिकारक असीम .प्रेमळ

असतो." एकदा एका सहकाऱ्याला देवी आल्या. त्यांनी त्याची शुश्रूषा केली. तुरुंगांतून आपल्या धाकट्या भावाला त्यांनी शेवटचें पत्र लिहिलें. त्यांत ते लिहितात, "तो उषःकाल होत आहे. भारताच्या भविष्याला कोण विरोध करू शकेल? सारें जग आमच्या विरुद्ध उभे ठाकलें तरी काय? माझ्या आयुष्याचें दिवस संपत आले आहेत. सकाळच्या संधिप्रकाशांत पेटणाऱ्या मेणबत्तीची ज्वाला निष्प्रभ होत जाते. त्याप्रमाणे मी निष्प्रभ होऊन जाणार. पण आमची श्रद्धा, आमचे विचार हे विजेप्रमाणे जगभर खळबळ उडवतील. या देहाची चिमूटभर माती त्यासाठीं नष्ट झाली तरी काय पर्वा?"

卐

## महान् सुधारक आगरकर

गोपाळरावांचा जन्म १८६६ मध्यें झाला.

ते मोठे हूड होते. खेळाडू वृत्तीचे. कऱ्हाड जवळच्या टेंभू गावीं बाळपण गेलें. कृष्णेच्या पाण्यांत तासन्तास डुंबायचे. पुढें वऱ्हाडांत अकोल्यास शिकायला गेले. घरी स्वयंपाकाचें कामहि पडे. गरिबींतून शिकत होते. दोन वर्षे मराठीची शिष्यवृत्ति मिळाली. भाषांतर करण्यांत पटाईत. श्लोक पाठ

 करायचे. त्यांना इतिहास, संस्कृत काव्यें, नाटकें यांची अत्यंत आवड. घरकामामुळें एकदा शाळेंत जायला उशीर झाला तर हेडमास्तर महाजनी म्हणाले, "तुमच्या हातून काय अभ्यास होणार? तुम्ही असेच रखडणार." तेव्हा तेजस्वी गोपाळ उभा राहून म्हणाला, "तुमच्या सारखा एम्. ए. होईन तरच नांवाचा आगरकर."

अकोल्यास वऱ्हाड समाचार निघे. "तुम्ही लेख लिहित जा. पांच रुपये महिना पाठवीन," असें संपादकांनीं आगरकरास कळविलें. गॅदरिंगमध्यें निबंधांत बक्षीस. पुढें पुण्यास आले. डेक्कन कॉलेजांत जाऊ लागले. एकच सदरा. रात्रीं धुवून ठेवायचे. सकाळीं तो घालायचे. परीक्षेच्या वेळीं फी नव्हती. एक नाटक लिहूं लागले. तेव्हां प्रा. केरुनाना छत्रे यांना कळलें. त्यांनी फी दिली. लो. टिळकहि त्याच वेळचे. दोघांनी पुढें शिक्षणास वाहून घ्यायचें ठरविलें. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं सरकारी नोकरी सोडून न्यू इंग्लिश स्कूल सुरू केलें होते. निबंधमाला, केसरी, मराठापत्रें सुरू केली होतीं. आगरकर, टिळक येऊन मिळाले.

गोपाळरावांनी मुन्सफ वगैरे व्हावे अशी घरच्यांची इच्छा. शिक्षणखातें रडकें खातें असें त्यांचें आप्तेष्ट म्हणाले. परंतु त्यांनी स्वच्छ सांगितलें, "मी शिक्षक होऊ इच्छितो. लोकांत स्वतंत्र विचार उत्पन्न होऊन सोन्नतीचे मार्ग लोकांना दिसूं लागतील अशाप्रकारच्या शिक्षकाचें काम करायचें आहे." त्यांनी आईला लिहिलें, "मी शिकून मोठी नोकरी करीन अशी आशा नको खेळवूं."

पुढें त्यांना एका संस्थानांत मोठी नोकरी मिळत होती. परंतु

त्यांनी ढुंकूनहि पाहिलें नाही. १८८० मध्यें एम्. ए. झाले. विष्णुशास्त्री मरण पावले. लोकमान्य व आगरकर यांना शिक्षा झाली. मुंबईच्या डोंगरीच्या तुरुंगांत दोघे १०१ दिवस होते. दोघांच्या दिवसरात्र चर्चा होत. दोघांतील मतभेद स्पष्ट झाले. दोघे स्वातंत्र्यभक्त. परंतु आगरकर म्हणत, "हा देश सडलेला. ना बुद्धि ना विवेक. रुढी नि अज्ञान. अशांना कोठले स्वराज्य ! श्रेष्ठकनिष्ठपणाचीं थोतांडे. शिवू नको धर्म. स्त्रियांची दुर्दशा." लोकमान्य म्हणत, "हें सारें सुधारूं तोवर देश आर्थिक शोषणानें मृतप्राय होईल. आधीं परके चोर घालवूं, मग घर सुधारूं."

हे दोन थोर पुरुष सुटल्यावर अलग झाले. आगरकरांनी सुधारक पत्र सुरू केलें. "इष्ट असेल तें बोलणार व शक्य असेल तें करणार" हा त्यांचा बाणा. आणि त्यांनी चौफेर हल्ला चढवला, तीं श्राद्धें, ती तर्पणें, तीं पिंडदानें, ती वपनें, ती सोवळीं ओवळीं, शेंड्या, जानव्यांचे, गंध–भस्माचें धर्म, ती थोतांडे, आगरकर विजेप्रमाणें आघात करूं लागले. सनातनी संतापले. आगरकर जिवंत असतांना त्यांची प्रेतयात्रा काढून त्यांच्या घरांवरून नेली. त्यांच्या पत्नीस काय वाटलें असेल. आगरकरांची पत्नी तुळशीबागेंत जायची. एकदा एका विद्यार्थ्यानें विचारलें, "तुमच्या पत्नी तर देव मानतात." ते म्हणाले "मी तिला सांगतो कीं देव वगैरे सारे झूट आहे. परंतु तिची श्रद्धा आहे. मला माझी मतें बनवण्याचा हक्क तसा तिलाहि."

आगरकर बुद्धीला प्रमाण मानणारे. एकदा त्यांनी सुधारकांत, महाराष्ट्रीयांस अनावृत्त पत्र लिहिलें तें प्रत्येकानें वाचलें

 पाहिजे. “ कां मी हें सारे लिहितो ? इतक्या टीका होतात तरी कां ? दारिद्र्य स्वीकारून हा वेडा पीर कां हें सारें प्रतिपादित आहे ? सुखाची नोकरी झुगारून, रोगाशीं झगडत, सर्वांचा विरोध सहन करून हा मनुष्य कां हे विचार मांडतो याचा जरा विचार तरी करा मनांत ” अशा आशयाचे ते उद्‌गार आहेत. परंतु शेवटीं म्हणतात, “ माझ्या विचाराचा समानधर्मी कोणी उत्पन्न होईल. पृथ्वी विपुल आहे, काळ अनंत आहे. ”

असे हे ध्यैर्याचे मेरु ! आणि किती साधे. फर्ग्युसन कॉलेजच्या प्रांगणांत एकदां सकाळी धाबळीची बाराबंदी घालून, एक-पंचा नेसून, एक डोक्याला गुंडाळून ते चिलीम ओढीत होते. दम्यासाठीं तंबाकूत औषधी मिसळून ते ओढीत. एक गृहस्थ भेटायला आले. “ आगरकर कोठे राहतात ? ” “ मीच तो. ” “ थट्टा नका करू. ” “ अहो खरोखरच मी आगरकर. ” “ स्त्रियांनीं जाकिटें घालावी सांगणारे तुम्हीच ना ? मला वाटलें तुम्ही अपटुडेट साहेब असाल. ”

एकदा ज्ञानप्रकाशांत आगरकर वाटेल तें खातात, वाटेल ते पितात असें कोणी लिहिलें. आगरकर म्हणाले, “ मी जर एक गोष्ट प्रतिपादणारा व दुसरी आचरणारा असेन तर शिक्षक व वर्तमानपत्रकार होण्यास नालायक आहे. तेव्हा माझ्यावरच्या आरोपाला अणुरेणु इतका पुरावा असेल तर दाखवा. नाहींतर आरोप परत घ्या. ” तो आरोप करणारा ज्ञानप्रकाशांत म्हणाला, “ या साधुपुरुषाची काय हो मी विटंबना केली ! अरेरे. ”

असला धुतल्या तांदळासारखा महापुरुष होता. लोकमान्यांची

व त्यांची भेट होत नसे. हे बालगोपाळ एकमेकांजवळ पुण्याच्या लकडी पुलावर दोघांची गांठ पडणार असें वाटलें. परंतु एकमेकांकडे न पाहतां दोघे गेले ! बेळगांवला लोकमान्य गेले होते, थिएटरांत त्यांची कोणी नक्कल केली. टिळक म्हणाले, "माझी नक्कल मला काय दाखवता ? त्याची दाखवा. त्या गोपाळाची." लोकांना वाटलें गोखल्यांची. तेव्हा टिळक म्हणाले, "तो दुसरा गोपाळ, निदान नकलेंत तरी त्याला पाहून समाधान मानीन !" टिळकांना आगरकरांविषयीं किती प्रेम. आगरकर वारले तेव्हा रडत रडत अग्रलेख त्यांनी सांगितला.

गोपाळराव दम्यानें आजारी असतच. ते म्हणाले, "आतां मी मरणाला तयार आहे. मला लोकांना जें सांगायचें होतें ते मी सांगून टाकले आहे." १५–६–१८९५ शनिवारीं जुलाब झाला. रविवारीं जरा बरें होतें. रात्रीं शौचास स्वतः जाऊन आले. हातपाय धुवून झाल्यावर पत्नीस म्हणाले, "आतां मला बरें वाटतें. मी निजतो. आणि तुम्हीहि निजा." परंतु ती शेवटची झोप. पहाटेस त्यांचे प्राणोत्क्रमण झाले. त्यांच्या उशाशीं एक पुरचुंडी होती. तिच्यावर एक चिठ्ठी होती. "माझ्या प्रेतदहनार्थ मूठमातीची पत्नीस पंचाईत पडूं नये म्हणून व्यवस्था."

असा हा धगधगित ज्ञानाचा नि त्यागाचा पुतळा होता. शतशः प्रणाम !

✦ ✦ ✦

卐

## मराठी भाषेचा शिवाजी चिपळूणकर

" मराठी भाषेचा मी शिवाजी आहे. माझ्यापूर्वी असा कोणी नव्हता, पुढें होणार नाही, " अशी अभिनव अभिमान भाषा उच्चारणारे श्री. विष्णुशास्त्री चिपळूणकर, १८८२ मध्यें मार्चच्या १७ तारखेस गुरुवारीं पहाटे आपली अवघी बत्तीस वर्षांची परंतु असीम तेजस्वी अशी कारकीर्द संपवून देहरूपानें निघून गेले.

१८५० च्या २० मेला त्यांचा जन्म. जीं स्वप्नें त्यांनीं मनांत खेळवलीं, जीं प्रत्यक्षांत आणण्यासाठीं त्यांनीं शेवटच्या श्वासापर्यंत धडपड केली तीं स्वप्नें आज स्वातंत्र्य-प्राप्ति होऊन कांही अंशीं पूर्ण झाली आहेत.

प्राथमिक शिक्षण होऊन ते इंग्रजी शिकूं लागले. पदवीधर झाले. वडील कृष्णशास्त्री त्यांना वकील, मुन्सफ व्हायला सांगत होते. परंतु भाषेची सेवा करणें त्यांनीं मनांत ध्येय ठरविलें होतें. वडील मराठींतील नामांकित लेखक. २५ वर्षे वडिलांनी हातांत खेळवलेली लेखणी पुत्रानें आपल्या हातांत घेऊन मराठी भाषेंत चमत्कार करून दाखविले. १८७४ मध्यें ' निबंधमाला ' मासिक सुरू होणार म्हणून ज्ञानप्रकाशांत जाहिरात झळकली. आणि सात वर्षें हें तेजस्वी मासिक चालले. त्याचे ८४ अंक निघाले. सारें लिखाण एकटांकी. शास्त्रीबोवाच निबंध लिहीत, परीक्षणें लिहीत, विनोदी चुटके लिहीत, थोरामोठ्यांच्या आख्यायिका देत. इतिहास, इंग्रजीभाषा, जॉन्सन, मोरोपंत, लोकहितवादी, देशाची सद्यःस्थिति इत्यादी पुस्तकाकार होतील असे निबंध त्यांनी लिहिले. मराठी भाषा वाटेल तो विचार, वाटेल ती भावना व्यक्तवूं शकते ही गोष्ट नवसुशिक्षितांच्या नजरेस त्यांनी आणून दिली.

भारत परतंत्र झाला होता. ५७ चा प्रयत्नहि संपला. मिशनरी व कांहीं नव सुशिक्षित भारतीय इतिहास व संस्कृति यांवर जहरी टीका करीत होते. ज्यानें त्यानें उठावें व प्राचीन भारतावर दगड मारावे. अशावेळेस ही धीरोदात्त मूर्ति उभी राहिली व सर्व घरचे व परके टीकाकार थंड

पडले. शास्त्रींबोवांना लोकहितवादी, महात्मा ज्योतिबा, न्यायमूर्ति रानडे, दयानंद वगैरेंवरहि प्रखर टीका करावी लागली. शास्त्रीबोवांना एक प्रचंड लाट परतवायची होती. स्वाभिमान जागवून नवपराक्रमास राष्ट्र उभें करावयाचें होतें. त्या काळांत जाऊं तेव्हांच त्यांच्या टीकेचें मर्म कळेल. परंतु ते प्रतिगामी नव्हते. लोकभ्रमासारखे निबंध त्यांनीं लिहिले. "स्त्रीचा पति मेला म्हणून जर ती अशुभ तर कोणाची आई मेली, बाप मेला, तर तोहि कां अशुभ मानूं नये, पत्नी मरून १३ दिवसहि झाले नाहींत तो पुन्हां लग्नाला उभा राहणारा मात्र शुभ ठरावा ना?" असें ते विचारतात. जॉन्सनवरच्या निबंधाच्या अखेरीस लिहितात, "प्रस्तुत चरित्रापासून नवीन विद्वानांनी सतत उद्योग करण्याविषयीं उपदेश घ्यावा. त्यांना हल्ली जी पोकळ घमेंड वाटते कीं विश्वविद्यालयांतून आपण पार पडलो कीं ज्ञानाची अत्यंत सीमा गांठली, ती त्यांनीं अगोदर दवडली पाहिजे. तरुणजनांस वाचण्यालायक नानाप्रकारचीं मनोरंजक पुस्तकें, बहुश्रुत लोकांच्या उपयोगी पडण्यासारखें तऱ्हेतऱ्हेच्या माहितीचे चमत्कारिक ग्रंथ, देशांतील जुनी कविता व इतिहास साऱ्या भारतवर्षीयांच्या किंबहुना साऱ्या जगाच्या प्रीतीचें व पूज्यबुद्धीचें स्थान झालेली जी प्राचीन गीर्वाण भाषा तींत काय काय ज्ञानभंडार आहे, फारशी भाषेंत काय मौज आहे. याविषयीं शोध, हिंदुस्थानी, गुजराथी वगैरे एतद्देशीय भाषांचा मराठीशीं कितपत संबंध आहे, व्याकरणरित्या सर्वांचा कसकसा मेळ आहे. इत्यादी उद्योग करण्याचें आमच्या पुढारी मंडळीनें मनांवर घेतलें असतें तर आजची

लोकांची स्थिति किती निराळी असती ? यासारखेंच देशी 
शेतीकडे व देशी व्यापाराकडे जर कोणी लक्ष दिलें असतें व आपल्या इंग्रजी ज्ञानाचा लाभ देशबंधूंस त्यांच्या भाषेच्या द्वारा करून दिला असता व शेकडो व्यावहारिक कृत्यांचा संबंधानेंहि त्यांस माहिती करून दिली असती, तर त्यांस सर्वांस केवढें भूषण झालें असतें !"

त्यांनीं सरकारी नोकरी सोडली. न्यू इंग्लिश स्कूल एक जानेवारी १८८० मध्यें स्थापिलें. मुलांना पुस्तकें हवींत म्हणून किताबखाना, छापायला हवींत म्हणून चित्रशाळा असे उद्योग आरंभिले. आपल्याकडे चित्रांची प्रथा नव्हती. चित्रशाळेंतून 'रामपंचायतन' हें पहिलें रंगीत चित्र छापलें गेलें, हजारो प्रती खपल्या. आणि पुढें केसरी व मराठा हीं दोन साप्ताहिकें सुरू केलीं. निबंधमाला बंद करून ग्रंथमाला सुरू करणार होते. परंतु एके दिवशीं फोटोसाठीं उन्हांत उभे राहिले. घेरी येऊन पडले. हाच आजार. याच आजारांत ते देवाधरीं गेले.

" तुम्ही इतकें कडक कसें लिहितां ?" असें कोणी विचारलें तेव्हा ते म्हणाले, " आमचा एक पाय तुरुंगांत असतो. " ते मेले तेव्हां केसरीवर खटला चालूच होता. आगरकर, टिळक हे डोंगरीच्या तुरुंगांत गेले तेव्हा विष्णुशास्त्री देवाघरी होते. परंतु त्यांची तयारी होती. त्या काळांत ते गडगंज पैसा मिळविते. एकदां न्यू इंग्लिश स्कूल पहायला तेलंग आले होते. ते म्हणाले, " अशा संस्थेंत काम करावें, असें मलाहि वाटतें. परंतु दोन लाख रुपये शिल्लक टाकूं दे. अजून कांहीं हजार कमी आहेत !" विष्णुशास्त्री यांचा त्याग यावरून

 दिसून येईल. ते पुस्तकें घेण्यांत पैसा खर्चित. पुण्यास टाऊन हॉल करण्यासाठीं सभा भरली. आंकडे कोण घालणार? कोरा कागद एका हातांतून दुसऱ्या हातांत जात होता. शास्त्रीबोवांनी आपल्या एक महिन्याच्या पगाराचा आंकडा घातला !

तेव्हां ते सरकारी हायस्कुलांत शिक्षक होते. असा हा कर्मवीर होता. त्यांनी हजारोंना स्फूर्ति दिली. त्यांचा 'इतिहास' हा निबंध वाचूनच राजवाडे त्या कार्यार्थ उभे राहिले. विष्णुशास्त्री वारल्याचें ऐकून, "मृत्यु म्हणजे काय तें मला आज कळलें" असें राजवाडे म्हणाले. टिळक, आगरकर सारे याच त्यागाच्या शाळेंत तयार झाले. "His fall was like the fall of Roman Empire"– स्विफ्टचें मरण रोमन साम्राज्याच्या पडण्याप्रमाणे वाटलें असें एकानें म्हटलें आहे. निबंध–मालाकारांचें तें मरण असेंच वाटलें. अवघ्या ३२ वर्षांच्या आयुष्यांतील खटाटोप! ते आद्य शंकराचार्य अद्वैताचा संदेश देऊन ३२ व्या वर्षीच निजधामास गेले. हा नवभारताचा द्रष्टा महापुरुषहि त्यागाची, ज्ञानोपासनेची, देशभक्तीची दृष्टि देऊन, नवप्रकाश देऊन निघून गेला.

✦ ✦ ✦

# कर्मवीर भाऊराव पाटील

कर्मवीर श्री. भाऊराव पाटील यांना मागील महिन्याच्या २७ तारखेस सातारा येथे एक लक्ष रुपयाची थैली कृतज्ञतापूर्वक देण्यांत आली.

कर्मवीर महर्षि भाऊराव पाटील यांचे शिक्षणक्षेत्रांतील काम अद्वितीय आहे. त्यांच्या संस्थांचा सातारा जिल्हाभर पसारा आहे. लाखोंचे वार्षिक अंदाजपत्रक असते. खेडयापाडयांतून

 प्राथमिक शाळा, निमदुय्यम शाळा, दुय्यम शाळा ठायीं ठायीं त्यांनीं स्थापिल्या. ट्रेनिंग कॉलेजें, पुरुषांचीं, स्त्रियांची काढलीं. सातारा येथें सुंदर हायस्कूल चालविलें. कॉलेज सुरू केलें. एवढेंच नव्हे गांधी विद्यापीठ काढण्याचाहि भव्य संकल्प बोलून ठेवला आहे. मी त्यांच्या संस्था पाहिल्या आहेत. मुलें स्वयंपाक करीत आहेत, सफाई करीत आहेत, सारें पाहिलें आहे. भाऊरावांनीं या कार्यात तनमनधन ओतलें. त्यांच्या पत्नीनें मंगलसूत्रहि संस्थेस शेवटीं सर्मपिलें होतें. त्याग व कष्ट नि अपार निष्ठा यांच्या पायावर त्यांनीं थोर काम उभें केलें.

विशेषत: मागासलेल्या समाजांतील विद्यार्थ्यांना पुढे आणणें हें त्यांचे गौरवास्पद कार्य आहे. "भविष्य राज्य तुमारा मानो; अऐ मजदूरो और किसानो" असे आपण म्हणतों. तो भार खांद्यावर घेऊं शकतील असे खंदे नवतरुण, ज्ञान-विज्ञानसंपन्न असे निर्माण करणें त्यासाठीं आवश्यक. ही आवश्यकता कर्मवीरांनी ओळखली हें त्यांचे ऋषित्व. ऋषी हा त्रिकालज्ञ लागतो. भूतकाळांतील अनुभव जमेस धरून वर्तमानांत वावरत असताना जो भविष्याकडे दृष्टी ठेवतो तो ऋषि.

महर्षींनीं अनेक तरुणांना परदेशांत पाठविलें आहे. कोणी परत आले आहेत. अशा रीतीनें ज्यांना आपण मागासलेले म्हणतों त्यांच्यात आत्मविश्वास उत्पन्न करणें, त्यांच्यांत प्रखर अशी ज्ञानज्वाला पेटविणें हे थोर कार्य होय. श्री भाऊरावांनी तीन तपांवर सेवा करून आपलें नांव अजरामर केलें आहे. आपल्या सेवेचा कळस म्हणून गांधी विद्यापीठ—जेथून ग्रामीण

विद्येतील पारंगत विद्यार्थी बाहेर पडतील–सहकारी शिक्षण, मधुमक्षिका शिक्षण, चर्मोद्योग, दुग्धालयें, अशा अनेक विषयांतील तज्ज्ञ पदवीधर बाहेर पडतील असें विद्यापीठ त्यांच्या हातून उभे केलें जावो हीच मंगल आशा प्रकट करून महर्षींच्या सेवेला प्रणाम करतों. त्यांच्या विद्यार्थ्यांना धन्यवाद देतो.

कर्मवीर भाऊराव पाटील

# ज्ञानमहर्षि डॉ. केतकर

डॉ. केतकर यांची महाराष्ट्रीयांस आठवण आहे का ? केवढी विद्वत्ता, केवढें धैर्य ! त्यांच्या स्मृतीस प्रणाम करूं या. त्यांनी अनेक प्रवर्तक कादंबऱ्या लिहिल्या. विद्यासेवक मासिक चालविलें. समाजशास्त्रावर लेख लिहिले. साहित्यपरीक्षणात्मक ग्रंथ लिहिला. काव्येंहि लिहिलीं. निःशस्त्रांचें राजकारण पुस्तक लिहिलें. परंतु ज्ञानकोश, त्याचे पांच प्रस्तावना खंड

आणि अपूर्ण असा महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास ही त्यांची सर्वांत थोर कामगिरी होय. प्रणाम त्या थोर ज्ञानर्षीला !

ज्ञानकोश संपादून महाराष्ट्राला अशीं कामें करता येतात ही श्रद्धा त्यांनी दिली. शब्दकोश, चरित्रकोश, धर्मकोश, व्यायामकोश असें विविध कोशवाङ्मय मराठींत निर्माण झालें, होत आहे, याची स्फूर्ति ज्ञानकोशकारांनीं दिली.

ज्ञानकोशकार डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर त्यांच्या थोर स्मृतीला पूज्यभावानें प्रणाम करणें हें महाराष्ट्रीयांचे कर्तव्य आहे. ज्ञानकोशकार केतकरांनीं मराठींत एक नवीन युग निर्मिलें. अमेरिकेंत "हिंदुधर्मांतील जाति" या विषयावर निबंध लिहून त्यांनी डॉक्टर पदवी मिळविली. ते हिंदुस्थानांत आले. त्यांच्या डोळ्यासमोर मराठी ज्ञानकोशाची भव्य कल्पना उभी राहिली. शंभर शंभर रुपयांचें भांडवल त्यांनीं उभारलें. शंभर रुपये भरणारास ज्ञानकोशाचे सर्व भाग मिळणार होते. या शंभरांची किंमत पुढें अर्थात वाढली. प्रथम नागपूरला हें मंडळ काम करूं लागलें. पुढें पुण्यास आलें. आणि तेथेंच हें भगीरथ कार्य त्यांनी अनेकांच्या सहकार्यानें पुरें केलें. त्या कार्यांत त्यांना अनेक अडचणी आल्या. सरकारनेंहि पाठिंबा दिला नव्हता. डॉक्टर केतकरांच्या निष्ठेनें हें काम पार पाडलें.

ज्ञानकोशाचे पहिले पांच प्रस्तावना खंड अपूर्व आहेत. तसाच हिंदुस्थानच्या इतिहासाचा शेवटच्या एक खास भागहि महत्वाचा आहे. ज्ञानकोशाचे प्रस्तावना खंड बाहेर पडूं लागले. त्यांचा महाराष्ट्रांत अभ्यास व्हावा अशी डॉक्टरांची इच्छा. त्यांनीं त्या भागांची परीक्षा ठेवली. मी पहिल्या

 भागाच्या परीक्षेसाठीं बसलों होतों. निम्में बक्षीस मिळालें. तें घ्यावयास मी त्यांच्याकडे गेलों होतों. मी तें बक्षीस ज्ञानकोश घेण्यासाठीं खर्च करायचें ठरविलें. डॉक्टर मला म्हणाले, "तुम्ही ज्ञानकोशाचे महाराष्ट्रांत प्रचारक व्हा." मी म्हटलें, " मी मुखदुर्बळ मनुष्य. कोणाला आग्रहानें सांगणे जमत नाहीं." ते म्हणाले, "अमेरिकेंत जाण्यापूर्वी मी असाच होतों. परंतु आतां संकोच सारा गेला. भीड गेली." त्या वेळची त्यांची मुद्रा अजून डोळयांसमोर आहे. ते अपार काम करीत. ज्ञानकोशाचे खण्ड गडयाच्या डोक्यावर देऊन दादर वगैरे भागांत जाऊन ते खपविण्यासाठी खटपट करीत. ते नेहमीं म्हणायचे " भरपूर पगार घ्या. भरपूर काम करा. आमचे प्राध्यापक कमी पगार घेऊन त्याग दाखवूं बघतात. परंतु ज्ञानाच्या सीमा वाढवतील तर शपथ."

मी त्यांना पुण्यांत खाली सूटबूट तर वर पगडी असें पाहिलें आहे. कधी हरदासी अंगरखा घातलेले पाहिलें आहे. एखाद्या हॉटेलमध्यें जातील. चिवडा, शंकरपाळे खातील. लकडी पुलाजवळ करवंदे खात उभे असलेले मी त्यांना पाहिलें आहे. औपचारिकपणा, फाजील शिष्टाचार त्यांना आवडत नसावा.

त्यांच्या कादंबऱ्या त्यांच्या विशाल अनुभवातून जन्मलेल्या आहेत. नाना धर्मांचें, नाना जातिजमातीचें, नाना देशांचें, नाना प्रान्तांचें त्यांचे मार्मिक परीक्षण. तें सारें अनुभवधन त्यांनी कादंबऱ्यांतून ओतले. ब्राह्मणकन्या या कादंबरींतील शेवटची 'नवीन स्मृति' नवदृष्टी देणारी आहे. डॉक्टर केतकर हे विचारांना धक्के देणारे होते. त्यांची प्रज्ञा खोल

नि व्यापक होती. समाजाचा त्यांचा अभ्यास गाढ होता. लोकमान्य टिळक आणि इतिहास संशोधक राजवाडे यांच्याविषयीं त्यांना अपार भक्ति. 

हिंदुधर्मांतील अनेक गोष्टींबद्दल त्यांना आदर होता. त्यांनी जर्मन विदुषीजवळ विवाह केला. परंतु व्रात्यस्तोम यज्ञ करून त्यांनीं त्यांना हिंदु करून घेतलें. या विदुषीचें नांव शीलवती बाई. महर्षि सेनापति बापटांसारखे थोर धर्मज्ञ या विवाहांत पुरोहित होते. डॉक्टर केतकर प्रस्तावना खंडाच्या पहिल्या भागात म्हणतात, "हिंदुधर्मातील संग्राहकता राहिली असती तर महंमद पैगंबर हेहि एक अवतार मानले गेले असते व अनेक पंथांप्रमाणें हा एक महंमदी पंथ हिंदुधर्मांत राहिला असता." एखादे वेळेस किती उच्च नि उदार विचार ते मांडित. एक कोटी टिळक फंडाचें काय केलेंत असा हिशोब विचारणाऱ्यांना ते म्हणाले "असहकार हा एक नवीन शब्द गांधींनीं हिंदी जनतेस शिकविला. एक कोटी रुपयांहून त्याची किंमत अधिक आहे."

डॉ. केतकर हे महाराष्ट्राचें भूषण आहेत. ज्ञानाची उपासना त्यांनीं शिकविली. सहकारी तत्त्वावर एकत्र येऊन साहित्य सेवा करायला त्यांनीं शिकविलें. त्यांच्या स्मृतीस कृतज्ञतापूर्वक प्रणाम.

✦ ✦ ✦

卐

## हुतात्मा कोतवाल

आज देश स्वतंत्र आहे. स्वातंत्र्याचा लाभ घरोघर अजून जावयाचा आहे. परंतु परसत्ता दवडून सर्वांचे संसार सुखाचे करण्यासाठीं जो स्वातंत्र्यसंग्राम करावा लागला त्यांत ज्ञात अज्ञात अनेकजणांचे त्याग आहेत. अनेकांचे हाल, अनेकांचीं बलिदानें आहेत. त्यांतील कांहीं डोळ्यांसमोर सदैव राहतात. त्यांना प्रणाम करून आपण सर्वांच्याच त्यागाला प्रणाम करित असतों.

भाई कोतवाल गरिबींत जन्मले, गरिबींत वाढले. मोठ्या कष्टानें त्यांनीं शिक्षण घेतले. ते वकील झाले. परंतु पैसा त्यांच्या डोळ्यासमोर नव्हता. दरिद्री जनता त्यांच्या डोळ्यासमोर होती. कुलाबा जिल्ह्यांतील कर्जत तालुका हे त्यांचे कर्मक्षेत्र. ते समाजवादी पक्षांत सामील. महाराष्ट्र शाखेचे ते चिटणीस होते. त्यांनी संघटना आरंभिली. जंगलचे कंत्राटदार कातकरी वगैरेंना कोळसा पाडतांना कसे छळतात, तें आतां लोकांस माहीत झालें आहे. भाई कोतवाल यांनी त्यांचीं संघटना केली. शेतकऱ्यांचीही संघटना सुरू केली. शेतकऱ्याला बीबियाणेंहि महाग घ्यावें लागतें. जवळचें थोडे फार भात संपलें कीं महाग विकत घ्यावें लागतें. भाई कोतवालांनीं धान्यकोठ्या सुरू केल्या. त्यांतून शेतकऱ्यांस धान्य मिळे. शेतकऱ्यांचे खटले ते चालवित. जनतेचे ते प्राण होऊं लागले.

अशावेळेस ४२ चा लढा आला. ९ ऑगस्टची अमर तारीख उजाडली. 'चलेजाव' शब्द आधीच उच्चारला गेला होता. त्याच्या जोडीला 'करेंगे या मरेंगे' मंत्र आला. महात्माजींनीं दिलेले हे दोन महान मंत्र आहेत. जें जें मानवतेला मारक आहे, आत्मविकासाच्या आड येणारें आहे त्याला 'चले जाव' म्हणायचें आणि तोंडानें केवळ न म्हणतां त्यासाठीं 'करेंगे या मरेंगे' या निर्धारानें धडपडायचें, सर्वस्व अर्पावयाचें. महात्माजींचें हे दोन मंत्र घेऊन भाई कोतवाल आपल्या तालुक्यांत गेले.

त्यावेळेस लढा लढणारे बाहेरचे मंडळ होतें. ठायीं ठायीं टापू अहिंसक रीतीनें म्हणजे कोणाचे प्राण न घेतां स्वतंत्र

 करायचे आणि अशा रीतीनें स्वतंत्र टापू वाढवीत जायचे. या स्वतंत्र प्रदेशाला मग मात्र परसत्तेशी सशस्त्र लढा करायला काँग्रेसच्या धोरणानुसार प्रतिबंध नाहीं असेंहि ठरलें होतें. कारण काँग्रेसहि स्वातंत्र्य मिळाल्यावर हाती शस्त्र घेऊन लढणारच होती. भाई कोतवालांनीं कर्जत तालुका स्वतंत्र म्हणून जाहीर केला. माझ्या स्वतंत्र तालुक्यांत ब्रिटिश सत्तेचे पोलीस नकोत. त्यांनी व त्यांच्या मित्रांनी पोलिसांचीं हत्यारें लांबविलीं. पोलिसांना हात नाहीं लावला. परंतु ब्रिटिश सत्ता हें थोडेंच सहन करणार? लष्कर धुमाकळ करीत आलें. भाई कोतवाल हे सिद्धगड किल्ल्यावर होते. पुणें, कुलाबा, ठाणे. तिन्ही जिल्ह्यांचा हा किल्ला म्हणजे किल्ली. परंतु फितुर माणसानें पत्ता दिला. रात्री बॅटऱ्यांचा प्रकाश पाडीत हॉल साहेब व सैनिक, पोलीस निघाले. भाई कोतवाल निजलेले होते. पहारेकरी होता. गोमा पाटील यांचा तो मुलगा. हिराजी त्याचें नांव. नांवाप्रमाणें तळपता हिरा होता. त्याला गोळी लागली. भाई कोतवाल उठले. त्यांनी बंदुक घेतली. परंतु त्यांनाहि गोळी लागली. तरीहि ते निसटून जाऊं पहात होते. परंतु अशक्य झालें. इतरांना म्हणाले, 'तुम्ही शक्य तर निसटा. जा." कांहीं पकडले गेले.

कांहीं निसटले. भाई कोतवालांनीं स्वातंत्र्याच्या सिद्धीसाठीं सिद्धगडावर प्राण ठेवले.

गोमा पाटील वगैरेंना पुढें शिक्षा झाल्या. पुढें सारे सुटले तेव्हां गोमा पाटील सुटले.

सिद्धगड हें तीर्थक्षेत्र आहे. जनतेनें तेथें स्तंभ उभारला आहे. परंतु हुतात्मा कोतवाल यांचे स्मारक हृदय–हृदयांत हवें. गरीब जनता जोंवर सुखी नाहीं तोंवर विसांवा नाहीं घेता कामा, सुखानें राहतां नाही कामा.

✦ ✦ ✦

हुतात्मा कोतवाल

卐

भारताची पुण्याई
सेनापति बापट

महर्षि सेनापति बापटांचा मला थोडा फार सहवास मिळाला त्यामुळें मी कृतार्थ झालों आहे. विनोबाजी व सेनापति हे माझे दोन हृदयदेव. मी त्यांच्यापासून दूर दूर असलों तरी एकांतांत त्यांच्याजवळ मुकेपणानें बोलतों. त्यांची थोडीफार कृपादृष्टि अनधिकारी असूनहि मला लाभते ही प्रभूची कृपा. सेनापति म्हणजे मूर्तिमंत त्याग व सेवा. स्वतःची विशिष्ट

मतें असली तरी सर्व पक्षांविषयीं आदर. कोणी कुठें सेवा करो. त्याचें कौतुक करतील. कोणी बोलावलें तर जातील. आपला जेवढा उपयोग होईल तेवढा होऊं द्यावा हें व्रत. वृद्धपण त्यांना माहित नाहीं. ते चिरयुवा आहेत. चिरवर्धमान आहेत. खरोखरच ते श्रीहरीचे आहेत. भलें जीवन जगणें हा त्यांचा धर्म.

आपल्या चैतन्यगाथा या कविता संग्रहांतील अखेरच्या कवितेंत ते म्हणतात, " प्रभूच्या बागेंतील मी बुलबुल आहे. भलाई हें माझ वतन आहे. "

ते महाराष्ट्राची, भारताची पुण्याई आहेत. त्यांच्या पुण्यपावन मूर्तीला भक्तिमय प्रणाम.

त्यांचा जन्म १८८० च्या नोव्हेंबरच्या १२ तारखेस नगर जिल्ह्यांत पारनेरला झाला. तो दिवस कार्तिक शुद्ध एकादशीचा. म्हणून पांडुरंग नांव.

सेनापतींच्या ज्या कांहीं गोड आठवणी मजजवळ आहे त्या सांगतो.

डेक्कन कॉलेजांत शिकत असतांना त्यांनीं एक दिवशीं तलवार हातीं घेऊन देशाच्या स्वातंत्र्यार्थ देह पडेपर्यंत धडपडण्याची शपथ घेतली. त्यांनी त्या दिवसाला मंगल दिवस असें म्हटलें आहे. कार्लाईलनें म्हटलें आहे, " ज्याला जीवनाचें ध्येय गवसलें तो धन्य होय. "

विलायतेंत चार वर्षें शिकायला होते. त्यांना स्वातंत्र्याचा ध्यास लागला होता. तेथें असलेल्या हद्दपार रशियन देशभक्तांजवळ बॉम्ब करण्याची विद्या शिकलें. लष्करी शिक्षणासाठीं एडिंबरोच्या रायफल तुकडींतहि नांव नोंदविते

 झाले. तेथील तरुणांचे म्होरके स्वातंत्र्यवीर सावरकर. सेनापति म्हणत, " सावरकर सुंदर बोलत. स्फूर्ति देत. "

सेनापति मातृभूमीला परत आले. कलकत्त्याला हिंदी क्रांतिकारकांच्या सूत्रधारांस भेटले. गोऱ्या अधिकाऱ्यांचे खून पाडण्याचें धोरण ठरलें होतें. सेनापति म्हणाले, " हा मार्ग नव्हे. जनतेंत जागृति करून योग्य वेळी बंड करूं. "

सेनापतींवर पकड वॉरंट निघाले. ते चार वर्षें अज्ञातवासांत गेले. शेवटीं अटक झाली. मुंबईच्या लॉकअपमध्यें आणलें. पोलीस अधिकारी व्हिन्सेंटसाहेबांवर सेनापतींच्या स्वच्छ व स्पष्ट वागण्याचा अपार परिणाम झाला. " तुम्हाला सोडलें तर काय कराल ? " या प्रश्नाला सेनापति म्हणाले, " वेळ आली तर सशस्त्र बंडहि करावें लागेल. "

पुढे सुटले. आपल्या पत्नीला अज्ञातवासांत एक करुण पत्र लिहिले, " मी अज्ञातवासांत एक प्रकारें नष्टवत्, मृतवत्. शास्त्राची अशा परिस्थितींत पुन्हां पति करायला संमति आहे. तूं पुनर्विवाह कर. " त्यांनीं आपल्या मित्रालाहि, " माझ्या पत्नीशीं विवाह लाव " म्हणून पत्र लिहिलें. मनाचा असा मोठेपणा कोठें पाहावयास मिळेल ?

सेनापतींच्या घरी मी गेलों कीं मला लेनिन–मिक्श्चर मिळायचें. रशियन क्रांतीचा पहिला वाढदिवस होता. मराठा पत्राच्या कचेरींत काम करीत होते. म्हणाले, " आपण हा मंगल दिवस येथें साजरा करूं. " डाळमुरमुरे आणले. म्हणालें, " घ्या हें लेनिन–मिक्श्चर. "

१९२०–२१ च्या मुळशी सत्याग्रहाचें नेतृत्व त्यांच्याकडे आलें, सेनापति हें नांव तेव्हांपासून त्यांना मिळालें. त्यांना

शिक्षा झाली. पुढें सुटले. पुन्हां सत्याग्रह. अखेर त्यांनीं १९२४ सालीं शस्त्र–सत्याग्रहहि केला. कोणाला ठार न करतां शुद्धबुद्धीनें शस्त्र घेऊनहि सत्याग्रह करता येतो हा सिद्धांत त्यांना मांडायचा होता. सात वर्षांची शिक्षा झाली. पुन्हां ३१ सालीं खुनाला उत्तेजन देणारें भाषण केलें म्हणून सात वर्षांची शिक्षा. 

कॉंग्रेस मंत्रीमंडळ आले तेव्हां सुटलें १९३७ मध्यें. नगरला भेटले तेव्हां म्हणाले, "तुरुंगांत तुमची पत्री वाचली, श्यामची आई वाचली. आवडलीं पुस्तकें." मला अपार आनंद झाला. मी एक धडपडणारा वेडावांकडा जीव. मी त्यांच्या चरणांकडे बघत होतों.

तुरुंगांतून बाहेर आल्यावर त्यांच्या मनांत प्राणयज्ञाची कल्पना खेळत होती. एकदां म्हणाले, "गंगेच्या तीरावर असतांना ही कल्पना मला सुचली. अहिंसा प्रभावी व्हायला अहिंसक सेनाहि हव्यात. हजार हजार माणसांनीं ध्येयार्थ प्राण फेकावे." स्वतः मुळा–मुठा संगमावर जलसमाधि घेण्याचा निर्णय घेतला. देशांतील भेद जावेत, हिंदु–मुसलमान ऐक्य यावें म्हणून, परंतु मित्रांच्या आग्रहानें म्हणा किंवा प्रभूच्या कृपेनें म्हणा सेनापतींनीं संकल्प दूर ठेवला.

१९३८ मध्यें धुळ्याची गिरणी तीन दिवसांत उघडली नाही तर तापींत उडी घेईन असें मी घोषित केलें. सेनापति धांवत आले. म्हणाले, "गुरुजी मरणार असतील तर मलाहि मेलें पाहिजे." परंतु गिरणीचा प्रश्न सुटला.

 दुसऱ्या महायुद्ध काळांत प्रचार सभांतून सेनापति युनियन जॅक जाळायचे. म्हणायचे, " इंग्रजांच्या स्वातंत्र्याची ही खूण म्हणून मी आदरानें तिला आधी ओवाळतो आणि आपल्या पारतंत्र्याची खूण म्हणून आतां जाळतो. "

अस्पृश्यांना पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरांत प्रवेश मिळावा म्हणून मी महाराष्ट्रभर हिंडत होतो. त्यावेळीं सेनापति माझ्याबरोबर होते. त्यावेळच्या किती आठवणी.

रस्त्यांत अपार धूळ. आम्ही नाकावर रुमाल धरायचे. सेनापति म्हणायचे, " उद्यां अमेरिकेंत शोध लागेल कीं धुळींत व्हिटॅमिन आहे. सुंदर धूलिकणानें भरलेल्या बाटल्या येऊं लागतील. मग त्या तुम्ही नाकांत कोंबाल. हें शरीर मातीचेंच आहे. जाऊं द्या थोडी धूळ नाकात. "

तात्यांना मुलें म्हणजे प्राण. अनेक ठिकाणीं जेवायला वेळ असला कीं जवळच्या मुलांना म्हणायचे, " या गोटया खेळूं या. तुमचा नेम नीट लागला तर बैदुल बक्षीस देईन. " तात्यांना दिसतें कमी. तरी ते अचूक नेम मारीत.

तात्या अंतर्बाह्य स्वच्छतेचे भोक्ते. सफाईचें काम करायचे. एकदा एका गांवी त्यांचे कपडे एका मुलानें त्यांना न कळत धुतले. पण नीट धुतले नाहींत. सेनापतींनीं दुसऱ्या गांवीं गेल्यावर ते स्वतः परत धुतले. म्हणाले, " काम करतों म्हटलें तर नीट केलें पाहिजे. " त्यांचे म्हणणें किती खरें !

सेनापति श्रीहरीचे चेले. म्हणायचे, " तो श्रीहरि मला सांगतो, तो मजवळ बोलतो. " मार्क्सवादी मित्रांना

म्हणायचे, "तुमच्या सर्व प्रयोगांच्या मागें माझा श्रीहरि मी ठेवीन." परंतु ते आग्रही नाहींत. ते खरोखरच सारें नाटक समजतात. हीं माणसें म्हणजे नाना प्रकारचीं पात्रें. गांधी खून खटल्यांत त्यांनीं सावरकरांच्या बचाव निधीला मदत केली. आर्थिक अडचणीमुळे सावरकरांना आपला बचाव करता आला नाहीं असें होऊं नये म्हणून. महात्माजींच्या खुनानंतर सेनापति जिवंत समाधि घेणार होते. देशांतील द्वेष–मत्सर शमावेत म्हणून.

तात्या शब्दाला जागणारे. एक दिवस मी मुंबईत राहतों तेथें आले होते. तेथें विश्वनाथ नांवाच्या तामिळ बिऱ्हाडकरूच्या मुलानें फार आग्रह केला तेव्हां म्हणाले, "परत कधीं तरी येईन." आणि खरेंच एक दिवस उजाडत आले. म्हणाले, "येईन म्हटलें होतें. आलों. मुलांना दिलेला शब्द पाळावा. माणसें खोटें बोलतात असें त्यांना वाटता कामा नये."

सेनापतींचा स्वभाव फार विनोदी. थोर सेवक हरिभाऊ फाटक नि सेनापति एकदां पुण्याच्या रस्त्यांतून चालले होते. रस्त्यांतला कोणताहि देव दिसला कीं हरिभाऊ चप्पल काढून नमस्कार करायचे. तसा त्यांनीं केला. सेनापति म्हणाले, "हरिभाऊ, देव दिसताच अगदी चप्पल काढता !"

अज्ञातवासांतून आल्यावर पारनेरला भंगी काम, साक्षरता इत्यादि सेवा करीत. वडिल गणपतीचे पुजारी. लोकांनीं त्यांच्याकडे तक्रारी केल्या. तेव्हां वडलांना म्हणाले, "तुम्ही

 गणपतीची पूजा करतांना त्याची बैठक साफ करता. मी माझ्या गणपतीची साफ करतों. माझा गणपति जगभर पसरला आहे."

सेनापतींचा महान् निरहंकारी त्याग, ही अखंड सेवा का फुकट जाईल ?

✦ ✦ ✦

अमर पुण्यपूंजि
कस्तुरबा

३० जानेवारीला बापूंचा श्राद्धदिन. २२ फेब्रुवारीला बांचा—कस्तुरबांचा श्राद्धदिन. पंचांगाप्रमाणें शिवरात्रीस त्या देवाघरीं गेल्या. बा आणि बापू ही भारताची मृत्युंजय अशी मोलाची ठेव आहे. राम—सीता, नल—दमयंती, हरिश्चंद्र—तारामती, सत्यवान्—सावित्री, वसिष्ठ—अरुंधती, अत्रि—अनसूया, तशीं बापू आणि बा नवभारताचीं उभयतां मायबाप.

कस्तुरीप्रमाणें बांचें जीवन सुगंधी. तो सुगंध चिरकाल राहील. महात्माजींच्या महान् प्रयोगांत त्या सामील झाल्या. ते आरंभींचे झगडे, ते संघर्ष. परंतु शेवटीं त्यांनीं जाणलें कीं मी ज्याची पत्नी झाले आहे, तो एक नवसंदेश देणारा पुरुष आहे. मी का त्यांच्या मार्गात अडथळा होऊं ? मला त्यांच्या भव्य प्रयोगांत समरस होऊं दे असें त्यांनीं ठरविलें.

" स्त्रिया यशाची शक्ति
भ्रताराची करिती भक्ति "

असें सावित्रीच्या गाण्यांत आहे. बा छायेप्रमाणें महात्माजींच्या मागोमाग गेल्या. जाणीवपूर्वक गेलीं ६० वर्षें एकत्र जीवन उभयतां जगलीं. किती प्रसंग असतील, किती अमर स्मृति असतील.

आपल्या विश्वविख्यात पतीप्रमाणें ही थोर माऊलीहि दु:खाचे घोट गोड करून पीत होती. पतीप्रमाणें त्याहि अनेक अग्निदिव्यांतून गेल्या, कसोटीच्या प्रसंगांतून गेल्या. पतीच्या ध्येयवादी जीवनाशीं त्याहि समरस झाल्या. त्यांच्या प्रयोगांत सामील झाल्या. त्यांनी दारिद्र्याचा वसा घेतला, राष्ट्राला मुक्त करण्यासाठीं तुरुंगाला मंदिर मानलें.

सारे मोह सोडले. स्वातंत्र्याच्या लढ्यांतहि गेल्या. १९३० सालीं महात्माजींना अटक झाली. कस्तुरबा पत्रकें काढीत होत्या. गुजराती नारींना तेजस्वी प्रेरणा दिली. बा निर्भय होत्या. सरकारी कृपेची त्यांनीं कधीं याचना केली नाहीं. महात्मा-

जींना ४२ सालीं अटक झाली. परंतु त्या मागें राहूं इच्छित होत्या लढा लढायला. शिवाजी पार्कवर ती राष्ट्रमाता लाखों जनतेसमोर उभी राहिली. परंतु सरकारनें आगाखान पॅलेस-मध्यें नेऊन ठेवलें. आणि बा पुन्हां भारताला दिसायच्या नव्हत्या.

त्यांचा आवडता महादेव अटक होऊन आठवडा होतो न होतो तों गेला. आपल्या पुत्रवत् महादेवाचें स्वर्ग-प्रयाण कस्तुरबांनीं पाहिलें. आणि महात्माजींचा तो उपवास. नाडी सांपडतनाशी झाली. यांची काय मनःस्थिति असेल? परंतु महात्माजी वांचले. बाच त्यांच्या आधी जायच्या होत्या. महात्माजींच्या मांडीवर त्यांना मरण आलें. "मी आहे तुझ्याजवळ, मी जाणार नाहीं दूर" महात्माजी म्हणा-त्चे. चितेजवळ राष्ट्रपिता शेवटपर्यंत उन्हांत उभा. दोन अश्रू त्या कारुण्यमय दृष्टींतून घळघळले!

गते, तुझें ते बंदिखान्यांतील मरण आम्ही कसें विसरूं? ण्याची ती समाधि म्हणजे भारताचें तीर्थक्षेत्र आहे. महादेवला तेथें तुमची चिर सोबत आहे. पुत्रवत् महादेवला कसें सोडून जायचें असें कां तुम्हाला वाटलें?

बा, कस्तुरबास्मारक निधीच्या रूपानें तुम्ही गांवोगांव जाल. त्या न सेविका काम करायला अधिकाधिक येतील. तुमचा संदेश सेवेनें देतील. भारताचें सतीत्व तुमच्या रूपानें प्रकट झालें. मृत्यूशी गंभीरपणें बोलणाऱ्या सावित्रीची वृत्ति

 तुमच्याजवळ होती. सीतेची दिव्य करण्याची वृत्ति होती. भारतीय पावित्र्य, पातिव्रत्य, धीरता, सेवा, सहानुभूति, प्रेम, मांगल्य, यांची तुम्ही मूर्ति होतां. हें राष्ट्र तुमचें चिर ऋणी आहे. केवढा उदात्त आदर्श ठेवून तुम्ही गेलांत ! बा आणि बापू ! या दोन नांवांत केवढी अद्‌भुत जादू, केवढी अमृतमय किमया ! तुमचे आत्मे भारताला तारित राहतील. बा, भक्तिप्रेमाचा कृतज्ञतेचा तुमच्या स्मृतीला प्रणाम !

तुमचें जीवन म्हणजे राष्ट्राची अमर पुण्यपूंजि. तें जीवन आम्हाला सत्प्रेरणा देवो.

समाप्त

काही निवडक
प्रकाशने

• • •

**राममनोहर लोहिया**
इंदुमती केळकर

**सफ्रेजेट आंदोलन**
इंदुमती केळकर

**विधान सभा : परिचय**
के. टी. गिरमे

**भारतीय न्याय व्यवस्था**
बॅ. वि. न. गाडगीळ

**दारुबंदीची नशा**
हरिभाऊ लिमये

**स्वप्न आणि सत्य**
साने गुरुजी

**संकेत**
मधु मंगेश कर्णिक

**त्याचं काय आहे**
वि. आ. बुवा

**रॉबिन्सन मंडळी**
भा. रा. भागवत

साने गुरुजींची
नवी पुस्तके

**मॅंग चियांग व**
**इतर गोष्टी**

**चंद्रभागेच्या वाळवंटी**